॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २०२ वा | मंगळवार, दि. १७ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे ?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता:औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

3000 Sq.ft. प्लॉट N.A. देणे आहे
शिनगारे सिटी सांगोला वासुद रोड, अल्टिमेट जिम च्या पूर्वेस
संपर्क :
डी. बी. शिंदे
9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

# परिस्थिती गंभीर, कठीण आणि चिंताजनक पण सुरळीत वितरणाची खात्री

## एलपीजी सद्यस्थितीबाबत पेट्रोलियम मंत्रालयाने दिली माहिती

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** एलपीजी (LPG) पुरवठ्याबाबत ग्राहकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन केंद्र सरकारने सोमवारी केले आहे. तसेच, साठाबाजी आणि काळाबाजार करण्याविरोधात कठोर कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

परिस्थिती कठीण, गंभीर आणि चिंताजनक असली तरी देशभरात सुरळीत वितरणाची खात्री करण्यासाठी पुरेशा उपाययोजना करण्यात आल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. विविध मंत्रालयांच्या संयुक्त बैठकीदरम्यान बोलताना, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी ही माहिती दिली आहे.

शर्मा म्हणाल्या की, राज्य सरकारे आणि स्थानिक प्रशासनांना परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यास आणि एलपीजी वितरणातील अनियमितता रोखण्यास सांगण्यात आले आहे. सध्याच्या परिस्थितीत आपण एलपीजी पुरवठ्याबाबत कठीण टप्प्याचा सामना करत आहोत, तेव्हा राज्य सरकारे आणि स्थानिक प्रशासनांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते; साठाबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी राज्य सरकारने पावले उचलण्याची गरज आहे, असे त्या म्हणाल्या.

शर्मा यांनी सांगितले की, जवळपास सर्वच राज्यांमध्ये नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत आणि परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी राज्य स्तरावर अनेक बैठका घेतल्या जात आहेत. तसेच, विविध ठिकाणी छापे टाकले जात आहेत आणि तेल विपणन कंपन्यांनी तपासणी करण्यासाठी विशेष पथके



कार्यान्वित केली आहेत.

शर्मा यांनी ग्राहकांना एलपीजी सिलिंडरची ऑनलाइन नोंदणी करण्याचे आवाहन केले. सिलिंडर थेट त्यांच्या दारापर्यंत पोहोचवले जातील आणि वितरकांकडे प्रत्यक्ष जाण्याची कोणतीही आवश्यकता नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच, लोकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि केवळ भीतीपोटी सिलिंडरची नोंदणी करणे टाळावे, असेही त्यांनी सुचवले.



सर्व तेल शुद्धीकरण प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत, पेट्रोल पंप्सचे कामकाज सुरळीत सुरू आहे आणि कोठेही इंधनाचा साठा पूर्णपणे संपल्याच्या घटनांची नोंद झालेली नाही. CNG आणि PNG ग्राहकांसाठी नैसर्गिक वायूचा पुरवठा १०० टक्के क्षमतेने कायम ठेवण्यात आला आहे; यामध्ये वाहनांसाठी लागणाऱ्या CNG चाही समावेश आहे, असे त्या म्हणाल्या

# गॅस टंचाईबाबत केंद्र-राज्य सरकार भूमिका का नाही स्पष्ट करत?

## खासदार सुप्रिया सुळे यांचा सवाल

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांमध्ये एलपीजी गॅस सिलिंडरची टंचाई निर्माण झाल्याचा गंभीर मुद्दा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला आहे.

या परिस्थितीबाबत केंद्र आणि राज्य सरकार स्पष्टपणे का बोलत नाहीत, असा सवालही त्यांनी केला. या टंचाईमुळे उद्योग,



घरगुती व्यवसाय आणि सामान्य नागरिकांचे दैनंदिन आयुष्य प्रभावित होत असल्याचे त्यांनी सांगितले.

सुप्रिया सुळे यांनी सांगितले की, व्यावसायिक गॅस सिलिंडरवर अवलंबून असलेल्या अनेक व्यवसायांचे कामकाज विस्कळीत झाले आहे. गॅस पुरवठा कमी झाल्याने अनेक आस्थापनांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. पुणे जिल्ह्यातील काही उद्योगांवर याचा थेट परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. धायरी परिसरातील पॉलिया तयार करणाऱ्या युनिट्सचे उदाहरण देताना सुळे म्हणाल्या की, या उद्योगांतून हिंजवडीतील कंपन्यांना पुरवठा केला जातो. मात्र गॅसचा पुरवठा कमी झाल्यामुळे या उद्योगांचे जवळपास निम्मे काम मंदावले आहे.

बारामतीमध्येही अनेक लघुउद्योग आणि खानावळी कमर्शियल गॅसवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. गॅस टंचाईमुळे काही हॉटेल आणि लहान व्यवसायांना तात्पुरते बंद ठेवावे लागल्याचे त्यांनी सांगितले. दौंड आणि इंदापूरसारख्या शहरांमध्येही परिस्थिती गंभीर असल्याचे सुळे म्हणाल्या. गॅस पुरवठा कमी झाल्यामुळे काही उद्योगांनी कामकाज कमी (पान 2 वर..)

# सोलापूर जिल्ह्यातील ६ साखर कारखान्यांवर जप्तीचा प्रस्ताव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारांनी शेतकऱ्यांच्या घामाचे दाम थकवल्याने प्रशासनाने आता कडक पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. उसाची रक्कम न देणाऱ्या २७ कारखान्यांपैकी, ६० टक्क्यांहून अधिक थकबाकी असलेल्या सहा प्रमुख कारखान्यांवरील कारवाईची सुनावणी पुणे येथील साखर आयुक्त कार्यालयात पूर्ण झाली आहे.

या कारखान्यांवर आता महसूल विभागामार्फत जप्तीची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील २७ कारखान्यांकडे शेतकऱ्यांचे ५१३ कोटी १७ लाख रुपये थकले आहेत. पुणे येथे साखर आयुक्तांसमोर सहा कारखान्यांची सुनावणी पार पडली. प्रादेशिक साखर संचालक कार्यालयाने या कारखान्यांवर एफआरपी कायद्यानुसार वसुलीसाठी जप्तीच्या कारवाईचा प्रस्ताव दिला आहे.

या ६ साखर कारखान्यामध्ये सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना (कुमठे), जकराया शुगर (वटवटे), लोकमंगल शुगर (बीबीदारफळ), वृंदावन शुगरस (इंद्रेश्वर-बार्शी), भैरवनाथ शुगर (लवंगी) आणि भीमा सहकारी साखर कारखाना (टाकळीसिकंदर) या कारखान्यांचा समावेश आहे.

जिल्ह्यात एकूण ३४ कारखान्यांनी गाळप केले असून, त्यापैकी ३३ कारखान्यांनी आपली माहिती प्रशासनाला सादर केली आहे.

ऊस हंगाम संपूनही पैसे मिळत नसल्याने शेतकरी संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला होता. त्यानंतरच प्रशासनाने ही सुनावणी आणि कारवाईची प्रक्रिया सुरु केली आहे.

# युद्ध लांबल्यास खतांच्या दरवाढीची शक्यता

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** युद्धाची धग गॅस सिलेंडरपासून चुलीपर्यंत पोचल्यानंतर आता शेतीच्या क्षेत्रातही खताची भाव वाढ होण्याची शक्यता समोर आली आहे. खत निर्मितीच्या कच्च्या मालाच्या आयातीमुळे ही स्थिती निर्माण होऊ शकते असे मानले जात आहे.

प्रामुख्याने युरिया व डीएपी ही दोन खते महत्त्वाची मानली जातात. सध्या या दोन्ही खतावर केंद्राने सबसिडी देऊन भाववाढीचा ताण येणार नाही अशी व्यवस्था केली आहे. मात्र या खताच्या निर्मितीसाठी अनेक घटक आयात करावे लागतात. आयात घटकांचे दर वाढत असताना त्याचा ताण दरवाढीत दिसू शकतो. त्यामुळे



येत्या खरीप हंगामात खताचे भाव वाढण्याची भिती व्यक्त होत आहे.

आधीच शेतमालाला भाव मिळत नसल्याने शेतकरी संकटात आहेत. लागवडीला जितका खर्च केला तितकाही पिके व धान्य विकून मिळत नसल्याने शेतकरी संताप व्यक्त करत आहेत. हवामान बदल, अतिवृष्टी, महापूर यामुळेही यंदा शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसान भरपाई होण्यासाठी शेतकरी पीकविम्याच्याही प्रतीक्षेत आहेत. त्याची किती रक्कम आणि केव्हा पदरात पडेल याचीही शाश्वती नसताना आता युद्धामुळे खतांचे भाव वाढणार असल्याने हे शेतकऱ्यांवर नवे सुलतानी संकट मानले जात आहे.

### बदलती स्थिती

जगातील एकूण खत व्यापारापैकी जवळपास ३० ते ३५ टक्के खताचा व्यापार या होमुर्झ खाडी मार्गाने होतो.

मार्चच्या पहिल्या दोन आठवड्यांतच जागतिक बाजारपेठेत युरियाच्या किमतीत २१ ते २९ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे.

नायट्रोजनयुक्त खतांच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेला नैसर्गिक वायू (नॅचरल गॅस) आणि फॉस्फेटसाठी लागणारा गंधक (सल्फर) यांच्या पुरवठ्यात अडथळे येत आहेत. नैसर्गिक वायूच्या किमतीत अचानक ४५ टक्के वाढ झाल्याने उत्पादन खर्च वाढला आहे.

* येथून खताच्या कच्च्या मालाची आयात
* नैसर्गिक वायू - कतार, सौदी अरेबिया, ओमान
* रॉक फॉस्फेट - मोरोक्को, जॉर्डन, इजिप्त
* फॉस्फरिक ॲसिड - मोरोक्को, सेनेगल, जॉर्डन
* सल्फर - सौदी अरेबिया, युएई, इराण
* पोटॅश - कॅनडा, बेलारूस, रशिया

# घरकुलाच्या शेवटच्या हप्त्यासाठी १२ हजारांची लाच

## उंबरगावचे ग्रामपंचायत अधिकारी व शिपाई एसीबीच्या जाळ्यात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मंजूर घरकुलाच्या शेवटच्या हप्त्यासाठी लाभार्थ्याकडून लाच मागितल्याप्रकरणी उंबरगाव (ता. पंढरपूर) येथील ग्रामपंचायत अधिकारी आणि शिपाई यांना सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सापळा रचून पकडले. या कारवाईत ग्रामपंचायत शिपाई दत्तात्रय अभिमान कांबळे यांनी तक्रारदाराकडून १२ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले.

या प्रकरणातील आरोपींमध्ये प्रशांत प्रकाश मुकरे (वय ४५), ग्रामपंचायत अधिकारी उंबरगाव, पंचायत समिती पंढरपूर तसेच दत्तात्रय अभिमान कांबळे (वय ४५), ग्रामपंचायत शिपाई उंबरगाव यांचा समावेश आहे.



या दोघांविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये कलम ७, ७-अ व १२ अंतर्गत गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया पंढरपूर ग्रामीण पोलिस ठाण्यात सुरू आहे.

एसीबीकडून मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांना पंतप्रधान आवास योजनेतून घरकुल मंजूर झाले होते. या योजनेअंतर्गत १ लाख २० हजार रुपये अनुदान मंजूर झाले होते. मात्र घरकुलाचा शेवटचा हप्ता देण्यासाठी आरोपींनी तक्रारदाराकडे २० हजार रुपयांची लाच मागितली होती.

> 'शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी यांनी कोणतेही काम करून देण्यासाठी कायदेशीर शुल्काव्यतिरिक्त लाचेची मागणी केल्यास नागरिकांनी घाबरून न जाता तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा. अशा प्रकरणांमध्ये एसीबीकडून कठोर कारवाई करण्यात येते.'
> – **प्रशांत चौगुले,** पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर

दि. १३ मार्च २०२६ रोजी पडताळणी कारवाईदरम्यान ग्रामपंचायत शिपाई दत्तात्रय कांबळे यांनी स्वतःसाठी तसेच ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत मुकरे यांच्यासाठी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तडजोडीनंतर १२ हजार रुपये देण्याचे ठरले.

यानंतर दि. १६ मार्च २०२६ रोजी एसीबीच्या पथकाने सापळा रचला असता ग्रामपंचायत शिपाई दत्तात्रय कांबळे यांनी तक्रारदाराकडून १२ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले.

ही कारवाई एसीबी पुणे परिक्षेत्राचे पोलीस उपायुक्त / पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक अजित पाटील तसेच पोलीस उपअधीक्षक प्रशांत चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस निरीक्षक रविंद्र लांभाते, पोलीस निरीक्षक शैलेश पवार तसेच एसीबी सोलापूरच्या पथकातील अधिकारी व कर्मचारी सहभागी होते.

# व्यावसायिक गॅसच्या टंचाईचा दूध बाजाराला फटका

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** व्यावसायिक वापराच्या गॅस टंचाईचा परिणाम दूध बाजारावरही होत असून, दुधाच्या मागणीत घट झाल्याने दरात घसरण झाली आहे. त्यामुळे उन्हाळ्याच्या तोंडावरच दूध उत्पादक शेतकरी अडचणीत आले आहेत.

अमेरिका-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर व्यावसायिक वापराच्या गॅसच्या पुरवठ्यात टंचाई निर्माण झाली आहे. गॅस उपलब्ध नसल्यामुळे अनेक ठिकाणी चहा कॅंटीन, मेस व खानावळी अडचणीत आल्या असून, काही ठिकाणी त्या बंद ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे या ठिकाणी होणारी दैनंदिन दूध खरेदी कमी झाली आहे.

याचबरोबर गॅस टंचाईचा



परिणाम लग्न समारंभ व इतर कार्यक्रमांवरही झाला आहे. अलीकडील काळात समारंभांमध्ये दुग्धजन्य पदार्थांचा मोठ्या प्रमाणात वापर होत होता. मात्र, सध्याच्या परिस्थितीमुळे त्यावर मर्यादा आल्या आहेत. परिणामी दुधाची मागणी घटली असून, सोलापूर शहरातील सिद्धेश्वर मंदिराजवळ भरणाऱ्या सुट्या दूध बाजारातही त्याचे पडसाद उमटले आहेत.

गत आठवड्याच्या तुलनेत चालू आठवड्यात दुधाच्या दरात प्रति फॅट एक रुपयाची घट झाली आहे. त्यामुळे दूध उत्पादकांना प्रतिलिटर सहा ते दहा रुपयांपर्यंत तोटा सहन करावा लागत आहे. वाढते तापमान, घटलेले दूध उत्पादन, चारा टंचाई आणि पशुखाद्याचे वाढलेले दर यामुळे आधीच अडचणीत असलेल्या दूध व्यवसायावर या नव्या संकटाचा अतिरिक्त ताण पडत आहे.


> मार्च महिन्यापासून दूध बाजारात मागणी वाढून दर ९ ते ९.३० रुपये प्रति फॅटपर्यंत गेले होते. मात्र गॅस टंचाई सुरू झाल्यापासून दर पुन्हा ८ रुपये प्रति फॅटपर्यंत घसरले आहेत. त्यामुळे मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. – **राहुल शिंदे,** दूध उत्पादक शेतकरी

# महाराष्ट्रातील सर्वात महागडा प्रवास

## सोलापूर ते मुंबई या प्रवासासाठी तब्बल 43 हजार रुपये

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरच्या विमानसेवेने अवघ्या काही महिन्यांतच मोठी झेप घेतली असली, तरी सध्या विमान तिकिटांच्या दरांनी गगनाला गवसणी घातली आहे. आगामी सलग सुट्ट्या, देवदर्शन आणि लग्नाचे मुहूर्त यामुळे सोलापूर विमानतळावर प्रवाशांची अभूतपूर्व गर्दी पाहायला मिळत आहे.

मागणी प्रचंड वाढल्याने सोलापूर-मुंबई विमान प्रवासाचे तिकीट प्रथमच तब्बल 43 हजार रुपयांपर्यंत पोहोचले आहे. विशेष म्हणजे, इतके महागडे तिकीट असूनही विमानातील सर्वच्या सर्व जागा आगाऊ आरक्षित



झाल्या आहेत.

सोलापूर ते मुंबई या प्रवासासाठी सामान्यतः 3500 ते 5000 रुपये भाडे आकारले जाते. मात्र, 19 ते 22 मार्च दरम्यान सलग सुट्ट्या येत असल्याने प्रवाशांनी विमान प्रवासाला पसंती दिली आहे. वाढत्या मागणीचा फायदा घेत खाजगी विमान कंपन्यांच्या 'डायनॅमिक फेअर'मुळे हे दर 12 ते 18 पटीने वाढले आहेत. रविवारच्या फ्लाईटसाठी शेवटचे एक तिकीट तब्बल 43 हजारांना विकले गेल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. केवळ मुंबईच नव्हे, तर सोलापूर-गोवा विमान प्रवासाचे दरही 18 हजार रुपयांच्या पार गेले आहेत.

### सर्व फ्लाईट्स 'हाऊसफुल्ल'

19 मार्च ते 22 मार्च या कालावधीत गुढीपाडवा, साप्ताहिक सुट्ट्या आणि पर्यटन यामुळे प्रवाशांची संख्या प्रचंड वाढली आहे. सोलापूरच्या श्री सिद्धेश्वर दर्शनासाठी येणारे भाविक आणि अक्कलकोटच्या श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी येणाऱ्या पर्यटकांनी विमानाची सर्व 60 आसने आधीच बुक केली आहेत. महागड्या तिकिटांमुळे सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लागली असली, तरी वेळेची बचत करण्यासाठी सधन वर्ग या दरांकडे दुर्लक्ष करून प्रवास करत आहे.

### वेळ वाचवण्यासाठी प्रवाशांची विमानाला पसंती

सध्या लग्नसराईचे मोठे मुहूर्त असल्याने अनेक कुटुंबे प्रवासासाठी विमानाचा आधार घेत आहेत. रेल्वेचे आरक्षण उपलब्ध नसल्याने आणि रस्ते मार्गामुळे होणारा वेळ वाचवण्यासाठी प्रवाशांनी विमानाला पसंती दिली आहे. मात्र, विमान तिकिटांच्या या लुटमारीवर नियंत्रण असावे, अशी मागणी आता सोलापूरच्या प्रवासी संघटनांकडून केली जात आहे.

# सोलापुरात 'वंचित'कडून प्रधानमंत्र्यांच्या पुतळ्याला जोडेमार; पोलीस - कार्यकर्त्यात झटपट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात आज वंचित बहुजन आघाडीच्या शहर आणि जिल्हा पदाधिकाऱ्यांनी आंदोलन करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडेमार केला. या आंदोलनावेळी पोलिस आणि वंचितच्या कार्यकर्त्यांमध्ये किरकोळ झटापट झाल्याची माहिती मिळाली आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी विविध राष्ट्रीय आणि आर्थिक मुद्द्यांवरून केंद्र सरकारच्या धोरणांचा निषेध करत आंदोलन छेडले. यावेळी 'मुद्रा मोदी ते मुजरा मोदी', 'नरेंद्र मोदी हटाव, देश बचाव' अशा





घोषणाबाजी करत कार्यकर्त्यांनी सरकारविरोधात जोरदार निषेध व्यक्त केला.

आंदोलनादरम्यान आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चेत असलेल्या जेफरे एपस्टईन प्रकरणाशी जोडले जात असल्याचा आरोप केला. या संदर्भात केंद्र सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणीही आंदोलकांनी केली.

तसेच अमेरिकेसोबत भारताने केलेल्या आर्थिक करारांबाबत आणि रशियाकडून तेल खरेदीच्या मुद्द्यावरही प्रश्न उपस्थित करण्यात आले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताच्या रशियाकडून तेल खरेदीवर लक्ष ठेवण्याबाबत केलेल्या कथित वक्तव्यावर केंद्र सरकारने स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी आंदोलकांनी केली.

या आंदोलनात जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार, विक्रांत गायकवाड, शाहिद शेख, यशपाल सोनकांबळे, सुहास सावंत यांच्यासह महिला आघाडी आणि युवा आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## संपादकीय

# भ्रष्टाचाराचे वाढते सावट आणि ढासळती विश्वासार्हता

देशाची शासन-प्रशासन व्यवस्था ही लोकशाहीची कणा मानली जाते. परंतु अलीकडील काळात या व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास दिवसेंदिवस कमी होत असल्याची गंभीर बाब समोर येत आहे. शासन आणि प्रशासनातील वाढता भ्रष्टाचार, निर्णय प्रक्रियेत दिसणारी अपारदर्शकता आणि नैतिकतेचा होत चाललेला ऱ्हास यामुळे लोकशाही व्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. ही परिस्थिती केवळ चिंताजनक नाही, तर भविष्यात अराजकतेकडे नेणारा धोकादायक प्रवास ठरू शकतो.

भ्रष्टाचार म्हटले की अनेकांच्या मनात फक्त आर्थिक गैरव्यवहाराचा विचार येतो. मात्र आज परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की आर्थिक भ्रष्टाचारासोबत वैचारिक आणि नैतिक भ्रष्टाचारही समाजात पसरताना दिसत आहे. अनेक ठिकाणी नियम, मूल्ये आणि तत्त्वे यांचा विचार न करता केवळ स्वार्थ आणि सत्तेच्या गणितावर निर्णय घेतले जात आहेत. दुर्दैवाने काही ठिकाणी हेच वर्तन जणू शिष्टाचाराचा भाग बनत चालले आहे.

या परिस्थितीची अनेक कारणे आहेत. त्यामध्ये सर्वात मोठे कारण म्हणजे निवडणूक प्रक्रियेचे वाढते पैशाकेंद्रीकरण. स्थानिक स्वराज्य संस्थांपासून ते राज्य आणि केंद्रस्तरावरील निवडणुकांपर्यंत पैसा हा निर्णायक घटक बनत चालला आहे. निवडणुकीत प्रचंड खर्च करणाऱ्या व्यक्तींना नंतर तो पैसा परत मिळवण्याची प्रवृत्ती निर्माण होते आणि याच ठिकाणी भ्रष्टाचाराची साखळी सुरू होते. परिणामी लोकशाही प्रक्रियेतील नैतिकता आणि पारदर्शकता धोक्यात येते.

या सगळ्या प्रक्रियेत मतदारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. परंतु आज मतदारांची भूमिका खरंच निर्णायक राहिली आहे का, हा प्रश्न अनेकांना पडू लागला आहे. मतदान हा केवळ एक औपचारिक कार्यक्रम न राहता तो सजग आणि विचारपूर्वक निर्णयाचा भाग असायला हवा. मतदारांनी स्वार्थ, दबाव किंवा क्षणिक लाभ यापलीकडे जाऊन समाजहिताचा विचार केला तरच लोकशाही अधिक सक्षम होऊ शकते.

राष्ट्रपिता यांनी समाज आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी काही मूलभूत मूल्यांवर भर दिला होता. त्यांच्या मते राजकारणात नीतिमत्ता, शिक्षणात चारित्र्य, सधनतेत परिश्रम, आनंदात विवेक आणि विज्ञानात मानवता असणे आवश्यक आहे. या मूल्यांच्या आधारावरच समाजाची निरोगी आणि सुदृढ घडण होऊ शकते, असे ते सातत्याने सांगत असत. परंतु आजच्या परिस्थितीकडे पाहिले असता या मूल्यांची आठवण केवळ भाषणांपुरती मर्यादित राहिल्याचे जाणवते.

आज गरज आहे ती केवळ भ्रष्टाचारावर टीका करण्याची नाही, तर त्याविरुद्ध ठोस भूमिका घेण्याची. शासन-प्रशासनातील पारदर्शकता वाढवणे, निवडणूक प्रक्रियेत आर्थिक नियंत्रण मजबूत करणे आणि समाजात नैतिक मूल्यांची जाणीव जागृत करणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. यासाठी राजकीय नेतृत्व, प्रशासन, सामाजिक संस्था आणि सर्वसामान्य नागरिक यांनी सामूहिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

लोकशाही केवळ कायद्यांच्या आधारे टिकत नाही; ती टिकते ती जनतेच्या विश्वासावर. हा विश्वास डळमळीत झाला तर व्यवस्था कमकुवत होते. त्यामुळे शासन, प्रशासन आणि समाज या तिन्ही स्तरांवर प्रामाणिक आत्मपरीक्षण होणे आवश्यक आहे. अन्यथा भ्रष्टाचाराचे वाढते सावट आणि ढासळती विश्वासार्हता देशाच्या लोकशाही पायाभरणीलाच हादरा देऊ शकते.

पान १ वरून

## गॅस टंचाईबाबत केंद्र-राज्य...

केले असून अनेक ठिकाणी कामगारांची संख्या घटवण्यात आली आहे. ही टंचाई केवळ उद्योगांपुरती मर्यादित नसून घरगुती व्यवसायांवरही त्याचा परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. घरातून अन्नपदार्थ बनवून विकणाऱ्या अनेक लहान व्यवसायिकांना गॅस सिलिंडर मिळत नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक नागरिकांना सिलिंडरसाठी लांबच लांब रांगा लावाव्या लागत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सुळे यांच्या मते ही समस्या केवळ एका जिल्ह्यापुरती मर्यादित नसून राज्यातील अनेक शहरांमध्ये ती जाणवत आहे. बारामती, जळगाव, नागपूर, पुणे, नाशिक आणि मुंबईसह अनेक ठिकाणी गॅस टंचाईबाबत तक्रारी येत असल्याचे त्यांनी सांगितले.

अधिकृत स्तरावर पुरवठा सुरळीत असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्ष परिस्थिती त्याला विरोधाभासी असल्याचे त्यांनी नमूद केले. यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असल्याचेही त्या म्हणाल्या.

या प्रश्नाकडे राजकीय दृष्टिकोनातून पाहू नये, असे आवाहनही त्यांनी केले. परिस्थिती समजून घेण्यासाठी केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावावी आणि सर्व नेत्यांना परिस्थितीची माहिती द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

जर गॅस पुरवठ्यात अडचणी असतील तर त्यावर सरकारची नेमकी कृती योजना काय आहे, हे स्पष्ट केले पाहिजे, असेही सुळे म्हणाल्या. महाराष्ट्रातील अनेक कुटुंबे, लघुउद्योग आणि कामगार गॅस पुरवठ्यातील अडथळ्यांमुळे अनिश्चिततेचा सामना करत आहेत. अशा वेळी पारदर्शकता आणि स्पष्ट धोरण अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

## फारूक शाब्दीमार्फत गोरगरीबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जागतिक पातळीवर युद्ध सुरू असल्याने सोलापुरात रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांची ससेहोलपट होत आहे. अनेक उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.हातावर पोट असणाऱ्या गोरगरीब नागरिकांची उपासमार होऊ नये यासाठी सोलापुरातील उद्योजक फारूक शाब्दी यांनी जीवनावश्यक वस्तू पुरवठा करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. दहा हजार किटचे वितरण होणार आहे,सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील गरजू लोकांना हे साहित्य मोफत दिले जाणार असल्याची माहिती फारूक शाब्दी यांनी दिली आहे.मुस्लिम धर्मीयांत रमजानचा महिना पवित्र महिना म्हणून ओळखला जातो.या महिन्यात गरिबांपासून श्रीमंता पर्यंत सर्व जण मोठ्या आनंदाने रमजान सण साजरा करतात.फारूक शाब्दी यांनी बोलताना सांगितले,या पवित्र महिन्यात सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत आम्ही जीवनावश्यक वस्तू पुरवणार आहोत. सध्या तरी आम्ही दहा हजार किटचे आयोजन केले आहे,गरज पडली तर आणखीन वाढवणार आणि तळागाळातील लोकांपर्यंत या किटचे वितरण करणार अशी प्रतिक्रिया हाजी फारूक शाब्दी यांनी दिली.

# बंधने फक्त महिलांवरच का ?

आज २१ व्या शतकात पुरुष आणि महिला असा कोणताच भेद राहिला नाही. आज महिलाही पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत. असे कोणतेच क्षेत्र नाही जिथे महिला पुरुषांची बरोबरी करू शकत नाही. कला, क्रीडा, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे मात्र समाजात आजही असा एक घटक आहे ज्यांना महिलांची ही प्रगती खटकत आहे. आजही तो घटक महिलांना केवळ चूल आणि मूल या पुरतच मर्यादित ठेवू इच्छितो म्हणूनच हे सनातनी विचारांचे प्रतिगामी लोक महिलांना सतत या ना त्या कारणांहून ट्रोल करत असतात. कधी ते महिलांच्या केशभूषे वरून ट्रोल करतात तर कधी ते महिलांना त्यांच्या वेशभूषेवरुन ट्रोल करतात. आजच्या मुली मुलांप्रमाणे कपडे घालतात, जीन्स पॅन्ट, टी शर्ट घालतात. त्यांच्या जीन्स पॅन्ट गुडघ्यावर फाटलेल्या असतात याचा त्यांना राग येतो तर कधी मुलींच्या नटण्या मुरडण्याचा त्यांना राग येतो तर कधी त्या व्यायामासाठी सोईस्कर असलेले छोटे कपडे घालून व्यायाम करतात म्हणून त्यांना महिलांचा राग येतो. असाच एक प्रसंग नुकताच घडला. प्रसिद्ध मराठी अभिनेत्री ऐश्वर्या नारकर यांनी त्यांच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर योगासने करतानाचा व्हिडिओ शेअर केला. या व्हिडिओमध्ये त्यांनी व्यायामासाठी सोईस्कर असलेले छोटे कपडे परिधान केले होते. मात्र एका नेटकऱ्याला ही गोष्ट खटकली आणि त्याने त्यांच्या व्हिडिओवर नकारात्मक कमेंट करत थेट सल्ला दिला, "कॅमेरा समोर तरी पूर्ण कपडे घालून योगा करत जा." अर्थात या कमेंटवर ऐश्वर्या नारकर यांनी त्या ट्रोल करणाऱ्या नेटकऱ्याचा चांगलाच समाचार घेतला. सोशल मीडियावर ऐश्वर्या नारकर यांनी नेटकऱ्याला दिलेले उत्तर चांगलेच चर्चेत आहे. महिलांना ट्रोल करण्यात सर्वसामान्य नागरिकच आघाडीवर आहेत असे नाही तर समाजातील प्रतिष्ठित घटकही मागे नसतात. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात हे कसले संस्कार असे ? असा प्रश्न मध्यंतरी उत्तरांचलच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत विचारला होता. केवळ हेच महाशय नाही तर अनेकजण महिलांच्या वेशभूषेवरुन महिलांना टार्गेट करत असतात वास्तविक कोणी कोणते कपडे वापरायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. सार्वजनिक ठिकाणी गुडघ्यावर फाटलेली जीन्स पॅन्ट फक्त महिलाच घालतात का? पुरुषही फाटलेली जीन्स घालतात. बरमुडा किंवा शॉर्ट पॅन्ट घालून गावभर फिरतात पण त्यांच्या कपड्यावर कोणीच आक्षेप घेत नाही. म्हणजे पुरुषांनी कसलेही कपडे वापरले तरी चालेल मात्र महिलांना ते स्वातंत्र्य नाही. महिलांना मात्र त्यांच्या आवडीचे कपडे घालायला बंदी. मग प्रश्न येतो बंधने फक्त महिलांवरच का? महिलांनी कोणते कपडे घालावेत हे ठरवण्याचा अधिकार पुरुषांना कोणी दिला? महिलांनी कोणते व कसे कपडे घालावेत, महिलांनी कोठे फिरावे, काय खावे, काय प्यावे हे पुरुषांनी ठरवावे ही तर अठराव्या शतकातील मानसिकता झाली. २१ व्या शतकातही महिलांना समान अधिकार मिळत नाही त्यांना त्यांच्या अधिकारासाठी झगडावे लागते ही दुदैर्वाची बाब आहे. स्त्री पुरुष समानता ही फक्त बोलण्यापूरतीच आहे हेच या मानसिकतेतून दिसून येते. जगात एकीकडे महिलांना समान अधिकार मिळावेत यासाठी चळवळ उभी केली जात आहे तर आपल्याकडे महिलांनी कसे राहायचे, तिने कोणते कपडे घालायचे, कसे कपडे घालायचे यावर चर्चा केली जाते. प्रश्न महिलांनी कसे आणि कोणते कपडे घालायचा हा नसून प्रश्न त्यांच्या निवडीच्या स्वातंत्र्याचा आणि महिलांच्या मानवी हक्काचा आहे. हे हक्क कोणीही हिरावून घेऊ नये. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात, तोकडे कपडे घालतात म्हणून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार होतात असा तर्क लढवला जातो. महिला संध्याकाळी बाहेर फिरायला जातात म्हणून त्यांच्यावर बलात्कार होतात असाही दावा तथाकथित संस्कृती रक्षक करतात पण ते सोयीस्करपणे हे विसरतात की आपल्या देशात अंगभर कपडे घातलेल्या साठ - सत्तर वर्षाच्या वृद्धेवर देखील बलात्कार होतो. विकृत मानसिकता असलेले लोक अंगभर कपडे घातलेल्या महिलांकडे देखील विकृत नजरेने पाहतात. अंगभर कपडे असोत की तोकडे कपडे असोत ज्यांची मानसिकता विकृत आहे त्या नराधमांना महिला केवळ भोगवस्तू वाटते. महिलांच्या कपड्यांवर भाष्य करण्याऐवजी ही पुरुषी मानसिकता बदलली तर देशात महिला अत्याचाराच्या घटना घडणार नाही.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

# फक्त ग्राहका तुझ्याचसाठी रे...

ग्राहक या शब्दाचा अर्थ ग्रहण करणारा. वाजवी किंमत आणि शुद्धता या ग्राहकाच्या मुख्य गरजा आहेत म्हणून जगभरातल्या ग्राहकांसाठी १५ मार्च हा खूप महत्त्वाचा दिवस आहे. इतर अनेक दिवसांसारखा हा कोण्या एका विशिष्ट जनसमुदायाला नव्हे, तर तमाम जनतेला कावेत घेणारा हा दिवस म्हणजे जागतिक ग्राहक हक्क दिन. सर्वप्रथम अमेरिकेचे प्रे. जॉन एफ. केनेडी यांनी राष्ट्राध्यक्ष म्हणून तेथील प्रतीनिधीगृहात १५ मार्च १९६२ रोजी केलेल्या पहिल्या भाषणात आपण सर्वजण ग्राहक आहोत असे सांगीतले. ग्राहकांचा सर्वात मोठा गट असूनही ग्राहकांचे मत सहसा ऐकून घेतले जात नाही अशी खंत व्यक्त करून ग्राहकाना चार हक्क दिले. नंतर १९८५ साली इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ कंजूमर युनियन या संस्थेने आणखी त्यात तीन हक्कांची भर टाकली.

भारत सरकारने २४ डिसेंबर १९८६ साली ग्राहकांचे संरक्षण करणारा ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आणला. त्यामध्ये १९९३ व २००२ साली बदल करून ग्राहक संरक्षणासाठी हक्क वाढवलेले आहेत. फक्त कायदे करूनही ग्राहकांचे संरक्षण होणार नाही तर त्याचे महत्त्व ग्राहकांना पटवून द्यावे लागणार आहे. या कायद्याचा मुख्य उद्देश ग्राहकांना सोप्या व साध्या पद्धतीने जलद व कमी खर्चात न्याय मिळवून देणे हा आहे. ग्राहकांना तक्रारींचे निवारण करण्यासाठी या कायद्यात जिल्हा न्याय मंच, राज्य आयोग आणि राष्ट्रीय आयोग अशा तीन तक्रार निवारण संस्था स्थापन करून त्यांनी दिलेला निकाल दोन्ही पक्षांवर कायद्याने बंधनकार केला आहे.

जो जन्मला तो ग्राहक. माणूस जन्मण्यापूर्वी ते मृत्यू पश्चात ग्राहक असतो हे आता वेगळे सांगण्याची गरज नाही. "ग्राहक हा अर्थव्यवस्थेचा राजा आहे, उत्पादक, व्यापारी, सेवांचे पुरवठादार इ. वर्गांचा तो पोशिंदा आहे, त्याच्या मागणीमुळे अर्थव्यवस्थेच्या चक्राला गती मिळते इ. वाक्ये अर्थशास्त्राच्या पुस्तकात वाचतांना मन सुखावते. मात्र प्रत्यक्ष व्यवहारात ग्राहकाला दिलेली वागणूक, परिस्थिती वेगळीच दिसते. कारण उत्पादनाचे व वितरणाचे सतत वाढणारे प्रमाण, गुंता गुंतीच्या प्रक्रिया, जाहिरात, सदोष वस्तू, अवाढव्य किंमती, ऑनलाइन खरेदी विक्रीचे व्यवहार या सवार्मुळे सद्याचा ग्राहक गोंधळून गेलेला आहे तसेच उत्पादकाकडून व विक्रेत्याकडून होणारी ग्राहकांची पिळवणूक वारंवार दिसते. या कायद्याला अनेक वर्षे झाली. त्याची उद्दिष्टे व संरचनांवर पुनर्विचार करून २०१९ रोजी या कायद्यात बदल करून ग्राहकाच्या व्याख्येमध्ये ऑफलाइन आणि ऑनलाइन दोन्हीमध्ये ग्राहकांचा समावेश केला. या कायद्यानुसार ग्राहकाला अनेक अधिकार आणि जबाबदारी दिली. परंतु आज कितीतरी ग्राहकांना या कायद्याची जाणीव व माहितीच नाही. नुकसान झाले तर नुकसानभरपाई कुठे, कशी मागायचे हे माहित नाही. या सर्व गोष्टींना तो स्वतः जबाबदार आहे. कारण जो ग्राहक संरक्षणाच्या बाबतीत सक्रिय भूमिका बजावतो तो जबाबदार ग्राहक असतो.

**तुम्हाला हे माहीत आहे का ?**

कोणत्याही हॉटेलमध्ये मोफत पाणी पिऊ शकता किंवा स्वच्छतागृहचा वापर करू शकता, जागो ग्राहक जागो! ही जाहिरात घराघरांत कशी पोहचली? सुटे पैसे नाहीत म्हणून दुकानदार तुम्हाला गोळ्या-चॉकलेट देऊ शकत नाही, दिलेलं वचन न पाळल्यास कंपनीवर कारवाई होऊ शकते, जाहिरातीमध्ये दिलेलं वचन न पाळल्यास तुम्ही कंपनीवर दावा तर ठोकू शकतातच, पण त्याचबरोबर त्या उत्पादनाची जाहिरात करणाऱ्या व्यक्तीवरही दावा करू शकता, शैक्षणिक संस्थांनी गुणवत्तेचे निकष न पाळल्यास त्यांच्यावर कारवाई होऊ शकते, रुग्णालयाने हलगर्जीपणा केल्यास कारवाई होऊ शकते, चित्रपटगृहांमध्ये खाद्यपदार्थ नेण्यास बंदी नाही. अशा अनेक गोष्टी आहेत जे ग्राहकांना माहीत नाही त्यामुळे फसवले जातात.

आज इंटरनेट, ई-कॉमर्स, स्मार्टफोन आणि क्लाऊड तंत्रज्ञान यासारख्या डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रवेश झाल्यामुळे गेल्या दोन दशकात भारतीय ग्राहक बाजारपेठेत मोठे बदल घडून आले आहेत. ग्राहक संरक्षण कायदा हा ग्राहकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी सर्वात महत्त्वाचा होता. तो ग्राहकांच्या बाजारपेठांमध्ये विशेषतः ऑनलाइन शॉपिंग, टेली शॉपिंग, प्रॉडक्ट रिकॉल, सुरक्षित करार आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिराती यामुळे ग्राहक कधीही ही फसला जाऊ शकतो. कायदा अस्तित्वात येऊन अनेक वर्षे झालीत पण थांबले का ग्राहकांचे शोषण? थांबली का त्यांची फसवणूक? त्यांना कायद्याने दिलेले अधिकारही माहित नाहीत. कायद्याचा धाक, दरारा निर्माण व्हायला हवा असेल तर तो ज्या घटकांसाठी केलेला आहे तो जागृत असायला हवा. ग्राहकांचे शोषण, फसवणूक थांबवायची असेल तर ग्राहक प्रशिक्षण, प्रबोधन व कायद्याने दिलेले अधिकारांची ग्राहकात जागृती करणे आवश्यक आहे.

**प्रा. तात्यासाहेब शिवाजी काटकर,**
अकलूज ९२२६१४४८३६
सदाशिवराव माने विद्यालय, अकलूज
(महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक असून ते शैक्षणिक व सामाजिक विषयावर लेखन करतात)

# जागतिक ग्राहक हक्क दिन

## "Safe Products, Confident Consumers"

दरवर्षी १५ मार्च रोजी साजरा होणारा जागतिक ग्राहक हक्क दिन हा दिवस ग्राहकांच्या अधिकारांविषयी जागरूकता वाढवण्यासाठी महत्त्वाचा मानला जातो. ग्राहकांना सुरक्षित, दर्जेदार आणि पारदर्शक सेवा मिळाव्यात, तसेच त्यांच्या तक्रारींना न्याय मिळावा यासाठी शासन विविध उपक्रम राबवत असते. महाराष्ट्रात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत ग्राहक हक्कांबाबत जनजागृती केली जाते.

ग्राहकांना बाजारपेठेत खरेदी करताना अनेकदा चुकीची माहिती, निकृष्ट दर्जाची उत्पादने किंवा फसवणुकीला सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत ग्राहकांना कायदेशीर संरक्षण देण्यासाठी विविध अधिकार देण्यात आले आहेत. या अधिकारांची जाणीव असणे हीच ग्राहकांसाठी सर्वात मोठी ताकद ठरते.

**ग्राहकांना मिळालेले सहा मूलभूत हक्क**

ग्राहक संरक्षण व्यवस्थेनुसार ग्राहकांना सहा महत्त्वाचे हक्क प्रदान करण्यात आले आहेत . हे हक्क बाजारपेठेतील पारदर्शकता आणि न्याय्य व्यवहार सुनिश्चित करतात.

**१. सुरक्षिततेचा हक्क**

ग्राहकांना अशा वस्तू व सेवांपासून संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे ज्यामुळे त्यांच्या जीवनाला किंवा संपत्तीला धोका निर्माण होऊ शकतो.

**२. माहिती मिळण्याचा हक्क**

वस्तू किंवा सेवांची गुणवत्ता, प्रमाण, किंमत, घटक, उत्पादनाची माहिती याबाबत ग्राहकांना संपूर्ण व अचूक माहिती मिळण्याचा अधिकार आहे.

**३. निवडीचा हक्क**

ग्राहकाला विविध पर्यायांमधून योग्य वस्तू किंवा सेवा निवडण्याचे स्वातंत्र्य असावे. जबरदस्तीने विक्री किंवा अन्याय्य व्यापार पद्धतीला प्रतिबंध आहे.

**४. ऐकून घेण्याचा हक्क**

ग्राहकांच्या तक्रारी योग्य मंचावर मांडण्याचा आणि त्या ऐकून घेण्याचा अधिकार ग्राहकांना दिला आहे.

**५. तक्रार निवारणाचा हक्क**

निकृष्ट वस्तू, चुकीची सेवा किंवा फसवणूक झाल्यास ग्राहकांना नुकसानभरपाई मागण्याचा व न्याय मिळवण्याचा अधिकार आहे.

**६. ग्राहक शिक्षणाचा हक्क**

ग्राहकांनी आपल्या हक्कांविषयी जागरूक असणे आणि फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी योग्य माहिती मिळणे आवश्यक आहे.

**सजग ग्राहक हीच खरी ताकद**

ग्राहकांनी वस्तू खरेदी करताना काही बाबींकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. वस्तूंवरील प्रमाणित चिन्हे जसे की भारतीय मानक ब्युरो (BIS), भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण (FSSAI), Agmark आणि ISO यांची नोंद असणे महत्त्वाचे असते.

तसेच पॅकेजिंगवरील उत्पादन तारीख, वापराची अंतिम तारीख (Expiry Date) आणि कमाल किरकोळ किंमत (MRP) तपासणे गरजेचे आहे. ऑनलाईन खरेदी करताना अधिकृत संकेतस्थळांचा वापर करावा आणि ओटीपी किंवा पिनसारखी गोपनीय माहिती कोणालाही देऊ नये.

**तक्रार नोंदविण्याची सोपी पद्धत**

ग्राहकांना त्यांच्या तक्रारी ऑनलाइन पद्धतीने नोंदवण्यासाठी केंद्र सरकारने e-Jagriti Portal ही प्रणाली उपलब्ध करून दिली आहे. या पोर्टलवर लॉगिन करून ग्राहक तक्रार दाखल करू शकतात. आवश्यक कागदपत्रे अपलोड करून प्रकरण नोंदवता येते आणि त्यावर पुढील कार्यवाही केली जाते.

याशिवाय ग्राहकांना मदतीसाठी राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईन क्रमांक १८००-११-४००० किंवा १९१५(टोल-फ्री). व Email ID: nch-ca@gov.in देखील उपलब्ध आहे.

ग्राहकांनी स्वतःच्या अधिकारांविषयी जागरूक राहून योग्य माहितीच्या आधारे व्यवहार केल्यास बाजारपेठ अधिक पारदर्शक आणि सुरक्षित बनू शकते. त्यामुळे 'सुरक्षित उत्पादने, आत्मविश्वासपूर्ण ग्राहक' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रत्येक ग्राहकाने सतर्क राहणे आणि आवश्यकतेनुसार आपल्या अधिकारांचा वापर करणे गरजेचे आहे.

**सजग ग्राहक - सक्षम समाज**

आधुनिक बाजारपेठेत ग्राहक हा अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू मानला जातो. ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण, त्यांना न्याय मिळवून देणे आणि व्यापारातील पारदर्शकता वाढवणे या उद्देशाने भारतात ग्राहक संरक्षणासाठी सक्षम कायदे व यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे.

भारतामध्ये ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी केंद्र सरकारने ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ लागू केला होता. बदलत्या तंत्रज्ञान, वाढत्या ई-कॉमर्स व्यवहार आणि डिजिटल बाजारपेठेच्या पार्श्वभूमीवर या कायद्याचे आधुनिकीकरण करून ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ लागू करण्यात आला. हा कायदा २० जुलै २०२० पासून देशभर प्रभावी झाला असून ग्राहकांच्या हक्कांचे अधिक व्यापक संरक्षण करण्यासाठी अनेक नवीन तरतुदी करण्यात आल्या आहेत.

**ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ ची वैशिष्ट्ये**

नवीन कायद्यामुळे ग्राहक संरक्षणाची यंत्रणा अधिक मजबूत झाली आहे.

मध्यस्थी कक्षाची तरतूद जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय ग्राहक आयोगांशी मध्यस्थी कक्ष जोडण्यात आले असून तक्रारींचे जलद आणि समन्वयाने निराकरण करण्यासाठी ही पर्यायी विवाद निवारण यंत्रणा उपलब्ध आहे.

या कायद्यात प्रथमच 'दिशाभूल करणारी जाहिरात' स्पष्टपणे परिभाषित करण्यात आली आहे. अशा जाहिरातींसाठी दंड आणि कारवाईची तरतूद करण्यात आली असून ग्राहकांची फसवणूक रोखण्यावर भर देण्यात आला आहे.

**उत्पादनाचे उत्तरदायित्व (Product Liability)**

निकृष्ट उत्पादनामुळे ग्राहकांना हानी झाल्यास उत्पादक, विक्रेते किंवा सेवा प्रदात्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. ग्राहक नुकसानभरपाईची मागणी करू शकतात.

**ई-कॉमर्स आणि डिजिटल व्यवहारांचे नियमन**

ऑनलाईन खरेदी वाढल्याने ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि डिजिटल व्यवहारांना देखील या कायद्याच्या कक्षेत आणण्यात आले आहे, ज्यामुळे ऑनलाईन ग्राहकांचे हक्क अधिक सुरक्षित झाले आहेत.

**ग्राहक तक्रार निवारणाची यंत्रणा**

ग्राहकांना न्याय मिळवण्यासाठी तीन स्तरांवर आयोग कार्यरत आहेत :

जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग - ₹५० लाखांपर्यंतची प्रकरणे

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग - ₹५० लाख ते ₹२ कोटीपर्यंतची प्रकरणे

**राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग - ₹२ कोटींवरील प्रकरणे**

या आयोगांमुळे ग्राहकांना न्यायालयीन प्रक्रियेपेक्षा तुलनेने सोप्या आणि जलद पद्धतीने न्याय मिळण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

**डिजिटल युगातील ग्राहक संरक्षण**

ई-जागृती (e-Jagriti) पोर्टल ग्राहकांच्या तक्रारींचे जलद आणि पारदर्शक निवारण व्हावे यासाठी भारत सरकारने ग्राहक न्यायव्यवस्थेचे डिजिटलायझेशन केले आहे. यामध्ये ई-जागृती (e-Jagriti) पोर्टल महत्त्वाची भूमिका बजावतात.

e- Jagriti ही ग्राहक न्यायालयांना संगणकीकृत करून एकमेकांशी जोडणारी प्रणाली आहे. या माध्यमातून जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय ग्राहक आयोगातील प्रकरणांची माहिती ऑनलाइन उपलब्ध होते. ग्राहकांना आपल्या तक्रारीची स्थिती, सुनावणीची तारीख, आदेश (orders) आणि कारणपत्र (cause list) इंटरनेटवर पाहता येते. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेत पारदर्शकता वाढते आणि ग्राहकांना वेळेवर माहिती मिळते.

या पोर्टलद्वारे ग्राहकांना घरबसल्या ऑनलाइन तक्रार दाखल करणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे, शुल्क भरने आणि प्रकरणाची स्थिती पाहणे शक्य होते. तसेच रटर आणि ई-मेलद्वारे प्रकरणाबाबतची माहितीही मिळते.

या डिजिटल प्रणालीमुळे ग्राहक न्यायव्यवस्था अधिक सुलभ, वेगवान आणि पारदर्शक झाली आहे. ग्राहकांना न्याय मिळवण्यासाठीची तक्रार निवारण प्रक्रिया अधिक कार्यक्षम झाली आहे.

**सजग ग्राहकांची गरज**

कायद्यांबरोबरच ग्राहकांची जागरूकता देखील तितकीच महत्त्वाची आहे. वस्तू खरेदी करताना पावती घेणे, उत्पादनाची माहिती तपासणे, ऑनलाइन व्यवहार करताना सावधगिरी बाळगणे आणि फसवणूक झाल्यास तक्रार नोंदवणे या बाबी प्रत्येक ग्राहकाने पाळणे आवश्यक आहे. कारण 'सजग ग्राहक हा सक्षम आणि न्याय्य बाजारव्यवस्थेचा पाया असतो.'

**वंदना रघुनाथराव थोरात**
वरिष्ठ सहायक संचालक
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय, मंत्रालय

# ‘टुरिस्ट गाईड ट्रेनिंग’ इच्छुक युवक-युवतींकडून अर्ज मागविले

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन संचालनालयामार्फत नमो पर्यटन कौशल्य प्रशिक्षण योजना अंतर्गत पुणे प्रादेशिक विभागातील इच्छुक युवक-युवतींसाठी सात दिवसीय Tourist Guide Training आयोजित करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणामध्ये पर्यटन स्थळांवर मार्गदर्शन, आदरातिथ्य सेवा तसेच पर्यटन क्षेत्राशी संबंधित विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्यात येणाऱ्या पर्यटकांना स्थानिक पर्यटन स्थळांची माहिती करून देण्यासाठी पर्यटन संचालनालयामार्फत पर्यटन सुलभ मार्गदर्शक (टूर गाईड) तयार करण्यात येणार आहेत. यासाठी स्थानिक युवकांना प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे, अशी माहिती पर्यटन संचालनालयाचे उपसंचालक भरत लांधी यांनी दिली आहे.

पुणे प्रादेशिक विभागातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या जिल्ह्यांतील इच्छुक उमेदवारांना या प्रशिक्षणामध्ये सहभागी होता येणार आहे. पुणे प्रादेशिक विभागातील प्रसिद्ध पर्यटनस्थळांबाबत पर्यटकांना मार्गदर्शन करण्यासाठी एकूण २०० युवकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पर्यटन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

या प्रशिक्षणासाठी ग्वाल्हेर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टुरिझम अँड ट्रॅव्हल मॅनेजमेंट (IITTM) तसेच महाराष्ट्र पर्यटन संचालनालयातील तज्ञ प्रशिक्षक मार्गदर्शन करणार आहेत. सात दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षणार्थींना पर्यटन संचालनालयाकडून प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच सिंहस्थ कालावधीत टूर गाईड म्हणून काम करण्यासाठी ओळखपत्रही देण्यात येणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी २० मार्च २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत गुगल फॉर्मद्वारे अर्ज करावा. अर्जांची निवड प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर केली जाणार आहे. नोंदणीसाठी खालील लिंकवर अर्ज करता येईल :

https://docs.google.com/forms/d/e/RFAIpQLScbnormXID80RehfCD_ZdxPyHbLDcUeAynPwPWHs4RgVKG4Q/viewform अधिक माहितीसाठी प्रादेशिक पर्यटन कार्यालय, पुणे येथे दूरध्वनी क्र. ८०८००३५१३४ वर संपर्क साधावा, असे आवाहन उपसंचालक भरत लांधी यांनी केले आहे.

## वात्रटिका

### मोसमी रंग

पाऊस सुद्धा अगदी
खोडकर आणि चावट आहे...
भर उन्हाळ्यात सुद्धा
गारपिठीचे म्हणे सावट आहे...
रंग बदलणाऱ्याच्या यादीत
पावसाचाही नंबर लागला...
काळा सरडाही रागाने
रंग बदलून लाल झाला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सिंहगड किल्ल्याचा विकास रायगड व शिवनेरी किल्ल्याच्या धर्तीवर व्हावा- सभापती युवराज काकडे

**थेऊर (कटूसत्य वृत्त):-** किल्ले सिंहगड येथील छत्रपती राजाराम महाराज यांच्या 326 व्या पुण्यतिथीचा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थित पार पडला. सिंहगड किल्ल्याचा विकास रायगड व शिवनेरी किल्ल्याच्या धर्तीवर व्हावा. तसेच छत्रपती राजाराम महाराज यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमासाठी वाढीव निधी मिळावा यासाठी, आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके यांच्या मार्गदर्शनाखाली शासन व जिल्हा परिषद स्तरावर पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही, हवेली पंचायत समितीचे नवनिर्वाचित सभापती युवराज हिरामण काकडे यांनी दिली.

छत्रपती राजाराम महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त सिंहगड किल्ल्यावर आयोजित शासकीय कार्यक्रम भक्तीभाव आणि उत्साहात पार पडला. या वेळी सभापती युवराज काकडे यांच्या



हस्ते महाराजांच्या समाधीस्थळावर पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अभिवादन करताना काकडे बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या रुपाली कोंडे, पंचायत समिती सदस्या शुभांगी खिरीड, सदस्य युवराज वांजळे, गटविकास अधिकारी शेखर शेलार, इतिहास संशोधक नंदकुमार मते, माजी पंचायत समिती सदस्य दत्तात्रय घोरपडे, फॉरेस्ट अधिकारी बळीराम वायकर, मोडी लिपी अभ्यासक अशोक पाटील, प्रा. देशमुख, नगरसेवक सचिन दोडके, अमित गायकवाड, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी तसेच ढमढेरे परिवारासह स्थानिक पदाधिकारी, शिवप्रेमी, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यापुढे बोलताना काकडे म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराजांचे सुपुत्र आणि मराठा साम्राज्याचे तिसरे छत्रपती असलेल्या राजाराम महाराजांनी मुघलांविरुद्धच्या संघर्षाच्या कठीण काळात स्वराज्य टिकवण्यासाठी मोठा लढा दिला. त्यांचे निधन 3 मार्च 1700 रोजी सिंहगड किल्ला येथे झाले. त्यानिमित्त दरवर्षी येथे पुण्यतिथीनिमित्त श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित केला जातो.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी "छत्रपती राजाराम महाराज यांच्या कार्याचा गौरव करत स्वराज्य टिकवण्यासाठी त्यांनी दिलेल्या ऐतिहासिक योगदानाची आठवण करून दिली. शिवभक्त व नागरिकांनीही महाराजांच्या समाधीस्थळी अभिवादन करून त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. उपस्थितांनी स्वराज्याच्या इतिहासाची आठवण करून देत छत्रपती राजाराम महाराजांच्या आदर्शावर चालण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला.

# वाळूज प्रशालेत आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्त्रीरोगतज्ञ डॉ. संदेश कादे यांची मुलाखत

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील वाळूज प्रशालेत विविध कार्यक्रमांचे आयोजन प्रशालेचे अध्यक्ष जनार्दन बापू कादे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख पाहुण्यानी दीपप्रज्जलन करून सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती कै.सुशांत पप्पा कादे यांच्या प्रतिमेचे पुजन डॉ. संदेश कादे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजयकुमार राजगुरू यांनी केले.

प्रशालेतील विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. संदेश कादे यांची मुलाखतवैष्णवी विकास पाटील, दुर्गा ब्रहदेव कादे, श्रावणी अमोल मोटे व शिवम इंद्रसेन मोटे या विद्यार्थ्यांनी घेतली. या मुलाखतीत डॉ. कादे यांनी आपल्या बालपणापासून ते डॉक्टर पर्यंतचा प्रवास कसा झाला. व आपल्या देशातील व परदेशातील आरोग्य व्यवस्था, पेशंट व डॉक्टर यांच्यातील संभाषण किती महत्वाचे असते अशा अनेक प्रश्नांची उत्तरे यावेळी दिली.

तसेच मातृभूमी प्रतिष्ठान बार्शी



यांच्यावतीने नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करून या शिबिरात वाळूज परिसरातील गरजू लोकांना तपासणी करून चष्मा देण्यात आला. याप्रसंगी प्रशालेतील विद्यार्थी विद्यार्थिनी, परिसरातील असंख्य ग्रामस्थ, माता-भगिनी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन युवा उद्योजक श्री साई होंडा बार्शीचे मालक युवराज कादे यांनी केली होती.

कार्यक्रम यशस्वी करण्याससाठी प्रशालेचे मुख्याध्यापक रावसाहेब पाटील, राजेंद्र जाधव सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी,व वाळूजच्या युवक वर्गांनी मोलाचे परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुरुराज कुलकर्णी यांनी केले तर शिवानंद बोधले यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

## जाहिर प्रसिध्दीकरण

कि.अर्ज.नं.१६२/२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे कोर्टात**

आयुब उस्मान शेख, वय-६०वर्षे,धंदा-व्यापार, रा.गवत्या मारुती चौक, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर. } **अर्जदार**

**विरूध्द**

मुख्याधिकारी, मोहोळ नगरपरिषद मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर (अर्जाची नोटीस मुख्याधिकारी मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर. यांचेवर बजावविण्यात यावी.) } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी त्यांचा जन्म ता.०१/०६/१९६५ रोजी मौजे मोहोळ, ता. मोहोळ येथे झालेला असुन त्यांच्या जन्माची नोंद मोहोळ नगरपरिषद मोहोळ यांचे जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे अर्ज या मे.कोर्टात दाखल केलेला आहे. त्याअर्थी वर नमुद अर्जदार यांच्या जन्माची नोंद मोहोळ नगरपरिषद मोहोळ यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाचे आत अथवा दि.१७/४/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीला मार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे ता.१६/३/२०२६

(शिक्का) **सही/-**
**तहसिलदार,मोहोळ.**

## जाहिर प्रसिध्दीकरण

कि.अर्ज.नं.१६१/२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे कोर्टात**

सादिक राहंमत पटेल, वय-५२ वर्षे, धंदा-व्यापार, रा.सिमोलंघन पांद रोड,आण्णाभाऊ साठे नगर, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर. } **अर्जदार**

**विरूध्द**

मुख्याधिकारी, मोहोळ नगरपरिषद मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर (अर्जाची नोटीस मुख्याधिकारी मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर. यांचेवर बजावविण्यात यावी.) } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी त्यांचा जन्म ता.०१/०६/१९७३ रोजी मौजे मोहोळ, ता.मोहोळ येथे झालेला असुन त्यांच्या जन्माची नोंद मोहोळ नगरपरिषद मोहोळ यांचे जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९चे कलम १३(३) प्रमाणे अर्ज या मे.कोर्टात दाखल केलेला आहे. त्याअर्थी वर नमुद अर्जदार यांच्या जन्माची नोंद मोहोळ नगरपरिषद मोहोळ यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाचे आत किवा दि.१७/४/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे ता./६/३/२०२६ **सही/-**

(शिक्का) **तहसिलदार,मोहोळ.**

# टेंभुर्णी बसस्थानकाचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर बसस्थानक' असे नामकरण करण्यासाठी भव्य मोर्चा

**टेंभुर्णी, (कटूसत्य वृत्त):-** बहुजन सत्यशोधक संघ या राष्ट्रव्यापी संघटनेच्या वतीने टेंभुर्णी शहरात शुक्रवार (दि. १३ मार्च) रोजी विविध मागण्यांसाठी भव्य मोर्चा काढण्यात आला. टेंभुर्णी येथील बसस्थानकाचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर बसस्थानक - टेंभुर्णी' असे नामकरण करण्यात यावे, तसेच सामाजिक न्याय विभाग व बार्टी संस्थेतील अनुसूचित जाती-जमातींच्या विकासासाठी असलेला निधी इतरत्र वळविणाऱ्या शासनाच्या निर्णयाचा यावेळी तीव्र निषेध करण्यात आला.

मोर्चाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. तसेच महात्मा ज्योतिराव फुले आणि अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांनाही अभिवादन करण्यात आले.



त्यानंतर शहरातील प्रमुख मार्गावरून मोर्चा काढण्यात आला. शेवटी टेंभुर्णी पोलीस ठाण्यासमोर मोर्चाची सांगता करण्यात आली.

यावेळी बहुजन सत्यशोधक संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील ओव्हाळ यांनी सामाजिक न्याय विभाग व बार्टी संस्थेतील अनुसूचित जाती-जमातींच्या विकासासाठी असलेला निधी शासनाकडून इतरत्र वळविला जात असल्याचा आरोप केला. या निर्णयामुळे अनुसूचित जाती व जमातीतील विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत असल्याचे त्यांनी सांगितले. शासनाने हा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, अन्यथा मुंबई येथील आझाद मैदान येथे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. तसेच येत्या १४ तारखेपर्यंत टेंभुर्णी बसस्थानकाचे नामकरण न झाल्यास महार वतन जागेतून बसस्थानक हटविण्याचा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी महावीर वजाळे यांनी सांगितले की, सन १९४२ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेंभुर्णी येथे आले होते आणि त्यांनी कार्यकर्त्यांची बैठक घेतली होती. त्यामुळे टेंभुर्णी ही ऐतिहासिक भूमी आहे.

तसेच सध्याचे बसस्थानक महार वतन जागेत असल्याने त्या बसस्थानकाचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर बसस्थानक - टेंभुणी' असे नामकरण तात्काळ करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी वडार समाजाचे नेते बाबा धोत्रे, महेंद्र सोनवणे, रणजित गायकवाड तसेच अधिवक्ता तुकाराम राऊत यांनीही बसस्थानकाचे नामकरण लवकरात लवकर न झाल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला.

या मोर्चामध्ये परमेश्वर खरात, यशपाल लोंढे, राजकुमार लांडगे, समीर नाईकनवरे, बिभीषण कांबळे, भीमा साळवे, अमर गायकवाड, अरविंद गायकवाड, सनी खरात, सूरज शिंदे, पोपट लोंढे, बबन किर्ते, निलेश खरात, राजवर्धन वजाळे, बाळासाहेब खरात, सचिन खरात, प्रशांत गायकवाड, श्रीकांत जवंजाळ, आबासाहेब पाटोळे, प्रकाश गायकवाड, राजाभाऊ शिंदे, मनोज शिंदे, महेंद्र शिंदे, कृष्णा पवार, उल्हास खरे, लक्ष्मण शिंदे, अतिश ओहोळ, सतीश वाघमारे, मल्हारी फाळके, समाधान कांबळे, विकी भोसले, गौतमी गायकवाड आदींसह शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या वेळी शासनाच्या वतीने टेंभुर्णी मंडळ अधिकारी सुजित शेळवणे, ग्राम महसूल अधिकारी शिवाजी घाडगे तसेच पोलीस उपनिरीक्षक अजित मोरे यांनी निवेदन स्वीकारले.

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र. अभि/कावि नं. /२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो,यांचे समोर**

श्री. सिकंदर असफ तांबोळी वय-४५ वर्षे, धंदा-शेती, रा. शेटफळ, ता. मोहोळ जि. सोलापूर } **अर्जदार**

**विरूद्ध**

ग्रामपंचायत शेटफळ ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत शेटफळ यांचेवर बजावविण्यात यावी.) } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचा जन्म ता. ०१/०६/१९८१ रोजी मौजे शेटफळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदार यांच्या जन्म दाखल्याची ता. ०१/०६/१९८१ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९८१ चे अभिलेखात अर्जदार म्हणजेच सिकंदर असफ तांबोळी यांची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२९/३/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता १३ / ३ / २०२६

**लिपीक** (शिक्का) **तहसीसहर मोहोळ**

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र. अभि/कावि नं. / २०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो,यांचे समोर**

सानिका दिपक नामदे वय- २१ वर्षे, धंदा- घरकाम, रा. पाटकुल, ता. मोहोळ जि. सोलापूर } **अर्जदार**

**विरूद्ध**

ग्रामपंचायत पाटकुल, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत पाटकुल, यांचेवर बजावविण्यात यावी.) } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचा जन्म ता. ०७/०८/२००४ रोजी मौजे पाटकूल, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदार यांच्या जन्म दाखल्याची ता. ०७/०८/२००४ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे ऑगस्ट २००४ चे अभिलेखात अर्जदार म्हणजेच सानिका दिपक नामदे यांचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२८/३/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. १३/३/ २०२६

**लिपीक** (शिक्का) **तहसीलदार मोहोळ**

# क्रिप्टो ट्रेडिंगच्या आमिषाने ७२ लाखांची ऑनलाईन फसवणूक करणारा अटक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर सायबर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या ऑनलाईन आर्थिक फसवणूक प्रकरणातील मुख्य सूत्रधार आरोपीला सुमारे एक वर्षानंतर अटक करण्यात सोलापूर शहर सायबर पोलीसांना यश आले आहे. सदर आरोपी परदेशात (नेपाळ) राहून तेथील चिनी व नेपाळी साथीदारांच्या मदतीने लाखो रुपयांची ऑनलाईन आर्थिक फसवणूक करत होता. त्याच्याविरुद्ध जारी करण्यात आलेल्या लुकआऊट नोटीसच्या आधारे त्याला दिल्ली येथील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून अटक करण्यात आली.

सोलापूर शहर सायबर पोलीस ठाणे गुन्हा क्रमांक ०४/२०२५ अंतर्गत भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८ (४), ३१९ (२), ३(५) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (उ) व ६६ (ऊ) नुसार दि. १६ मे २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात आरोपींनी फिर्यादी यांच्याशी ऑनलाईन संपर्क साधून क्रिप्टोकरन्सी ट्रेडिंगमध्ये १० ते ३०० टक्के नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर फिर्यादींकडून ऑनलाईन सुमारे ७२ लाख ६४ हजार रुपये गुंतवणूक करण्यास भाग पाडून आर्थिक फसवणूक करण्यात आली.

या गुन्ह्याच्या तपासात सोलापूर शहर सायबर पोलीसांनी आतापर्यंत एकूण चार आरोपी निष्पन्न केले आहेत. त्यामध्ये सूत्रधार आरोपी रोज मगर थापा (वय २३, पत्ता - बोसन, दक्षिणखली-१, काठमांडू, नेपाळ) तसेच त्याचा सहकारी दोरजे तमांग यांचा समावेश आहे. तपासादरम्यान फसवणुकीतील काही रक्कम सारस्वत बँकेत असलेल्या एम इंजिनिअरिंग नावाच्या चालू खात्यात वर्ग करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. तपासात पुढे असेही उघड झाले की, आरोपी रोज मगर थापा हा नेपाळचा नागरिक असून नेपाळमध्ये संपर्कात आलेल्या चिनी नागरिकांच्या सांगण्यावरून तो भारतात येऊन आपल्या साथीदारांसह



भारतीय नागरिकांना कमिशनचे आमिष दाखवत त्यांच्या बँक खात्यांचा वापर करत असे. त्या खात्यांमध्ये फसवणुकीची रक्कम जमा करून ती पुढे इतर खात्यांमध्ये वर्ग केली जात असे. आरोपी दिल्ली, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश व मणिपूर या राज्यांत राहून फसवणुकीचे जाळे चालवत होता. तपासादरम्यान आरोपीच्या पासपोर्टची माहिती मिळाल्यानंतर त्याच्याविरुद्ध सन २०२५ मध्ये लुकआऊट नोटीस जारी करण्यात आली होती. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी परदेशात असल्याने इमिग्रेशन विभागाशी समन्वय साधून त्याचा मागोवा घेण्यात आला. त्यानुसार दि. ८ मार्च २०२६ रोजी दिल्ली येथील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून त्याला ताब्यात घेण्यात आले. न्यायालयात हजर केल्यानंतर त्याला ६ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. आरोपीच्या इतर साथीदारांची माहिती मिळवून त्यांच्यावर अटकेची कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) डॉ. अश्विनी पाटील व सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) राजन माने यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहर सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीशैल गजा तसेच पोसई प्रविण भोपळे, नागेश इंगळे, पोह/२०८ मच्छिंद्र राठोड, पोह/६०२ प्रकाश गायकवाड आणि पोको ६६५ रतिकांत राजमाने यांच्या पथकाने पार पाडली.

### नागरिकांना आवाहन

सोलापूर शहर पोलीसांकडून नागरिकांना आवाहन करण्यात येते की, काही व्यक्ती कमिशन किंवा जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून लोकांना त्यांच्या नावाने बँक खाते उघडण्यास सांगतात. त्यासाठी पासबुक, एटीएम कार्ड, चेकबुक, मोबाईल सिमकार्ड, ओटीपी यांसारखी माहिती मागितली जाते. अशा प्रकारची माहिती कोणालाही देऊ नये. अन्यथा आपल्या बँक खात्याचा वापर करून इतर राज्यांतील लोकांची ऑनलाइन आर्थिक फसवणूक केली जाऊ शकते आणि नकळत आपणही गुन्ह्यात आरोपी ठरू शकता.

सोशल मीडियावर जास्त नफा मिळवून देण्याच्या जाहिरातींवर विश्वास ठेवू नये. या प्रकरणातील आरोपी किंवा नमूद बँक खात्याबाबत कोणाकडे तक्रार अथवा माहिती असल्यास सोलापूर शहर सायबर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

तसेच अशा प्रकारची घटना घडल्यास तात्काळ सायबर पोलीसांकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन सोलापूर शहर पोलीसांनी केले आहे.

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र. अभि/कावि नं. ५३९/२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो,यांचे समोर**

श्री. नानासाहेब ब्रम्हदेव घोडके वय - ४९वर्षे, धंदा-शेती, रा. कुरुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर } **अर्जदार**

**विरूद्ध**

ग्रामपंचायत कुरुल, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत कुरुल, यांचेवर बजावविण्यात यावी.) } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचा मुलगा म्हणजेच बाळुमामा नानासाहेब घोडके याचा जन्म ता. ०५/०६/२००८ रोजी मौजे कुरुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा मुलगा म्हणजेच बाळुमामा नानासाहेब घोडके याची जन्म दाखल्याची ता. ०५/०६/२००८ रोजीप्रमाणे मागणी वरील नमुद तारखेनुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून २००८ चे अभिलेखात अर्जदाराचा मुलगा म्हणजेच बाळुमामा नानासाहेब घोडके याची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१७/४/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. १३/३/२०१६

**लिपीक** (शिक्का) **हुकुमावरुन**

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र. अभि/कावि नं. / २०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो,यांचे समोर**

श्री. नवनाथ वसंत शिंदे, वय - ६० वर्षे, धंदा-शेती, रा. औंढी, ता. मोहोळ जि. सोलापूर } **अर्जदार**

**विरूद्ध**

ग्रामसेवक ग्रामपंचायत औंढी, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत, औंढी, यांचेवर बजावविण्यात यावी.) } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार म्हणजेच नवनाथ वसंत शिंदे यांचा जन्म ता. ०१/०१/१९६५ रोजी मौजे औंढी, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराची जन्म दाखल्याची ता. ०१/०१/१९६५ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी सन १९६५ साली नोंद नसल्यामुळे सदरचे रेकॉर्ड तहसिल कार्यालय मोहोळ येथे मिळेल असे तोंडी सांगितले. त्यामुळे अर्जदाराने दि. २०/०२/२०२६ रोजी अर्ज केला असता सन १९६५ मध्ये अर्जदाराच्या जन्माची नोंद तहसिल कार्यालय, मोहोळ येथील जन्म- मृत्यु रजिस्टर मध्ये नसलेचे सांगितले व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२९/३/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. १३/३/२०२६

**लिपीक** (शिक्का) **तहसीलदार मोहोळ**


# Classified - छोटी जाहीरात

## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**


**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

## वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**


मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**उमेश माने**
मो. 9353370779

**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) एकवीस दुणे
२) लिंबू पाण्याचे पेय ३) कजरा उलट लिहा ४) तय उलट लिहा
५) कोकणातील एक स्ट्राँग नेते
६) परंतु (हिंदीत) ७) पत्र (इंग्रजीत)
१०) ग्रॅज्युएट (मराठीत)
१२) थंड, शीत १५) ॲडव्होकेट (मराठीत)
१६) राजाबाबू चित्रपटातील गोविंदाचा पालक असलेला अभिनेता १७) बारा वर्षांचा काळ १९) एक फळ २०) देखणा, रूबाबदार व्यक्तिमत्त्व २१) फेब्रुवारी (हिंदीत) २३) सहा उलट लिहा २५) झी टीव्हीवरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या २६) कॉलनी (मराठीत) २७) वडिलोपार्जित असलेला संपत्तीचा हक्क
३०) याचे कणीस भाजून खातात
३१) उत्सवाचा दिवस
३३) वस्तूची विक्री ३४) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता, दीपिकाचा पती-**** सिंह ३५) दैत्य, दानव ३६) राखण, एकनाथ खडसेंच्या सून-** खडसे ३८) रोख
४१) वाट, मार्ग (हिंदीत)
४३) उदार मनाने देणे, ** करणे

**आडवे शब्द :**
१) बिहारमधील एक प्रख्यात जिल्हा व लोकसभा मतदारसंघ
५) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष
८) चांदी ९) बस अथवा ट्रकच्या केबिनचे छत
११) बगळा १२) गाणे गाणारा १३) दात, दंत
१४) नवऱ्याची दुसरी बायको १६) सबब, निमित्त
१८) शरीर (हिंदीत) १९) गुन्हा २१) सब्र का ** मिठा होता है
२२) एक भारतीय फलंदाज-अजिंक्य *** २४) तरचा साथीदार
२५) निश्चित, खात्रीशीर २६) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो
२८) जंगल अथवा डोंगराला लागलेली आग २९) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द
३१) सल्ला (हिंदीत) ३२) शुगर (मराठीत)
३५) पॉलिटिक्स (मराठीत) ३७) शरीर, काया ३९) परंतु, शर्थ
४०) चित्त, ध्यान, लाख
४२) हनुमानाच्या हातातील शस्त्र
४४) दहा गुणिले सात
४५) पुणे लगतचा एक जिल्हा

## सुडोकु - 202

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | | | 1 | 3 | | | 8 | |
| | | | | | | | | 7 |
| 8 | | | 7 | 6 | 4 | 9 | 1 | 2 |
| 6 | | | | | 9 | 1 | | 8 |
| 5 | | 3 | 8 | 7 | | 6 | | 9 |
| | | | | 5 | | | 7 | 4 |
| | 1 | 9 | 4 | | | | | 5 |
| | | | 9 | | | 2 | 4 | 3 |
| | | 2 | 6 | 8 | 3 | 7 | | |

# सोलापूरच्या विकासाचा प्रश्न: आश्वासनांच्या गर्दीत अडकलेले शहर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून विविध मूलभूत समस्या व विकासकामांच्या रखडलेल्या प्रकल्पांमुळे सोलापूर शहर अक्षरशः हतबल झाले आहे. पाणीपुरवठा, रस्ते, उद्योग, वाहतूक, पायाभूत सुविधा आणि सांस्कृतिक विकास अशा अनेक महत्त्वाच्या विषयांवर वारंवार आश्वासने दिली जात असली तरी प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी होताना दिसत नाही. यामुळे सोलापूरकरांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून शहराच्या विकासाबाबत सत्ताधारी आणि विरोधक दोघांकडूनही अपेक्षित गंभीरता दिसून येत नसल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत असल्याचे मत विविध संघटनां चालक व सामाजिक कार्यकर्ते मिलिंद भोसले यांनी व्यक्त केले.

### दररोज पाणीपुरवठ्याचे आश्वासन अजूनही अपूर्ण

गेल्या वीस वर्षांपासून शहरात दररोज पाणीपुरवठा सुरू करण्याचे आश्वासन निवडणुकांच्या वेळी वारंवार देण्यात आले. या योजनेसाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक खर्चही करण्यात आला. मात्र आजही सोलापूरकरांना दररोज पाणीपुरवठा मिळत नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

### ५४ मीटर रस्ता प्रकल्प आठ वर्षांपासून रखडलेला

छत्रपती संभाजीनगर ते सोरेगाव या ५४ मीटर रुंदीच्या महत्त्वाच्या रस्त्याचा प्रकल्प गेल्या आठ वर्षांपासून रखडलेला आहे. महापालिकेकडे ५६ कोटी रुपयांचा निधी नसल्याचे कारण देत हा प्रकल्प प्रलंबित ठेवण्यात आला आहे. सध्या असलेल्या रस्त्याची अवस्था अत्यंत खराब असून त्याचे दुष्परिणाम पुढील काळात स्पष्टपणे दिसून येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### विमानसेवेचा गाजावाजा; प्रत्यक्षात मर्यादित सेवा

सोलापूर विमानतळावरून विमानसेवा सुरू करण्याबाबत मोठा गाजावाजा करण्यात आला. मात्र आजही फक्त काही शहरांपुरतीच सेवा मर्यादित आहे. नाईट लँडिंगसाठी आवश्यक परवानग्यांबाबत न्यायालयीन स्तरावर कोणतीही ठोस प्रगती झालेली दिसत नाही.

### उद्योगविकासाचा अभाव; तरुणांचे स्थलांतर

सोलापूरमधील अनेक तरुण शिक्षण व रोजगारासाठी इतर शहरांकडे वळत आहेत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिसरात उद्योग उभारणीसाठी आवश्यक निर्णय प्रलंबित आहेत. आयटी क्षेत्राच्या विकासाबाबतही अनेक घोषणा झाल्या, मात्र प्रत्यक्षात प्रगती झालेली दिसत नाही.

### इलेक्ट्रिक बस प्रकल्पही ठप्प

आठ महिन्यांपूर्वी शहरात नवीन इलेक्ट्रिक बस सुरू करण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र अद्याप चार्जिंग स्टेशनच तयार झालेले नाही. याआधीही सुमारे १०० बसेस सोलापूरमध्ये आणण्यात आल्या होत्या, मात्र त्या बस एक दिवसच रस्त्यावर धावल्या आणि नंतर बंद पडल्या. या प्रकरणात सुमारे ८९ कोटी रुपये खर्च झाल्याचे सांगितले जाते, तर न्यायालयीन प्रक्रियेतही मोठा खर्च झाला असून बसेस सध्या निष्क्रिय अवस्थेत पडून आहेत.

### उड्डाणपूल प्रकल्पही रखडलेले

शहरातील बहुचर्चित दोन उड्डाणपूल प्रकल्प अनेक वर्षांपासून रखडलेले आहेत. अनेक वेळा उद्घाटने झाली, परंतु प्रत्यक्ष कामाला सुरुवातच झाली नसल्याची टीका नागरिकांकडून केली जात आहे.

### पूल बांधकामांमध्ये अडथळे

रामलाल चौकातील जुन्या पुलाला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर नवीन पुलाची प्रक्रिया सुरू करण्यात आली. मात्र डिझाइन मंजुरी व इतर तांत्रिक बाबींमुळे काम पुढे सरकत नाही. तर आसरा चौकातील पुलाचे काम पाणीपुरवठा पाइपलाइन आडवी आल्यामुळे सहा महिन्यांपासून थांबले आहे.

### शैक्षणिक प्रकल्पही रखडले

शासकीय तंत्रनिकेतनच्या मोठ्या इमारतीत अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा प्रस्ताव गेल्या आठ वर्षांपासून प्रलंबित आहे. आर्थिक तरतुदीअभावी हा प्रकल्पही पुढे सरकत नाही.

### सांस्कृतिक व क्रीडा सुविधांचा अभाव

इतक्या मोठ्या शहरात एकच नाट्यगृह आणि एकच एसटी स्थानक असल्याची परिस्थिती आहे. जुळे सोलापूर भागात नवीन जलतरण तलाव उभारण्याची घोषणा अनेक वर्षांपूर्वी झाली होती; मात्र तीही अद्याप प्रत्यक्षात आलेली नाही. महापालिकेवर सुमारे ५०० कोटी रुपयांचे कर्ज असून उत्पन्न सुमारे ६०० कोटी असल्याने विकासकामांसाठी निधीची मोठी अडचण निर्माण झाली आहे.

### टेक्सटाईल उद्योगाला आवश्यक पाठबळ नाही

सोलापूरचा टेक्सटाईल उद्योग मोठ्या प्रमाणावर असून येथे मोठे टेक्सटाईल पार्क उभारण्याची क्षमता आहे. मात्र अक्कलकोट व कुंभारी एमआयडीसी परिसरातही मूलभूत सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने उद्योगविकासाला मयार्दा येत आहेत.

### पर्यटन व सार्वजनिक सुविधांचा अभाव

बाहेरगावाहून येणाऱ्या पाहुण्यांसाठी शहरात पुरेशा बागा, चांगली मैदाने किंवा आधुनिक मनोरंजन सुविधा उपलब्ध नाहीत. ॲडव्हेंचर पार्कसारख्या प्रकल्पांचा अभावही प्रकर्षाने जाणवतो.

### जुळे सोलापूर व हद्दवाढ भागाकडे दुर्लक्ष

जुळे सोलापूर व हद्दवाढ भागातून मोठ्या प्रमाणावर कर महसूल मिळत असतानाही त्या भागासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याबाबत कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत. मुलींच्या आयटी इमारतीसह उद्योग भवनसारख्या इमारती अनेक वर्षांपासून वापराविना पडून आहेत.

### सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस चौक्यांची गरज

शहरात मोठ्या प्रमाणावर मिरवणुका, सण-उत्सव आणि विविध कार्यक्रम होत असतात. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेसाठी किमान सहा ते आठ नवीन पोलीस चौक्या व एक नवीन पोलीस परिमंडळ स्थापन करण्याची आवश्यकता असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### सोलापूरकरांची सकारात्मक आशा कायम

या सर्व समस्या असूनही सोलापूरकरांमध्ये शहराच्या विकासाबाबत आशा कायम आहे. भविष्यात शहरातील तरुणांनी रोजगारासाठी बाहेर जाण्याऐवजी इतर राज्यांतील युवकांनी सोलापूरमध्ये येऊन उद्योग व व्यवसाय सुरू करावेत, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. त्यासाठी सर्व स्तरांवर ठोस प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

# सोलापूर जिल्ह्यात गॅस वितरणासाठी आपत्कालीन कक्ष सुरू



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सध्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे गॅस पुरवठ्यावर परिणाम झाल्याने सोलापूर जिल्ह्यात काही ठिकाणी गॅस सिलेंडर वितरणात अडचणी निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाने गॅस वितरणाबाबत कडक उपाययोजना अंमलात आणण्यास सुरुवात केली असून जिल्ह्यात योग्य पद्धतीने गॅस वितरण व्हावे यासाठी जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या मान्यतेने जिल्हाधिकारी कार्यालयात २४७७ आपत्कालीन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

नागरिकांना गॅस किंवा पेट्रोल वितरणाबाबत कोणतीही अडचण अथवा तक्रार असल्यास 0217-2731012 या क्रमांकावर संपर्क करून तक्रार नोंदवावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. आपत्कालीन कक्षामध्ये प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

तसेच सोलापूर जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅस सिलेंडरचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी नागरिकांनी अतिरिक्त साठवणूक करू नये व प्रशासनास सहकार्य करावे. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी केले आहे.

### ग्रामीण भागातील गॅस वितरणाबाबत तक्रारीसाठी तालुकानिहाय संपर्क पुरवठा निरीक्षण अधिकारी :

मोहोळ - श्रीमती सोनाली निटुरे:9022008681 संबंधित अधिकारी - श्री. महेश घोडके : 9420089464
माढा -प्रितम पवार -9970827574 श्री. जी. जी. कुथलवाड : 9028065412
करमाळा - श्री. शत्रुघ्न चव्हाण :8805907686 श्रीमती दिव्यांश्री वामनराव ढोबळे : 8275753361
पंढरपूर -विजय बादल-9881235594
सांगोला - श्रीमती प्रांजली गावंडे : 7219616663/ श्रीमती प्रियांका राजेश जाधव 77743857838
मंगळवेढा - श्रीमती शितल कन्हेरे- 8390572257 श्री. जयंत कुलकर्णी 9175626749
माळशिरस - श्री. रविकिरण शेटे : 8275926955 श्री. एस. डी. केमकर - 7028122294
बार्शी - श्री. निलेश आठवले : 72018981344 / श्री. संतोष शिंदे : 9818562532
उत्तर सोलापूर -श्री. निखिल महानूर : 98690508161/ श्रीमती किरण सुरुशे : 74478145729
दक्षिण सोलापूर -श्री. नासिरखान पठाण : 9881563693/ श्रीमती रमा अमोल शिखरे - 8433628697
अक्कलकोट - श्री. विराज वासेकर : 8055904917/ श्रीमती पल्लवी शेडगे : 9766145986

### शहरी भागातील गॅस वितरणाबाबत तक्रारीसाठी संपर्क

1. परिमंडळ अधिकारी -श्री. संदीप नाईक : 8888969317
2. २. परिमंडळ अधिकारी -श्री. महादेव ढोके : 9665394594
3. प्र. परिमंडळ अधिकारी -श्री. सुभाष यमपुरे : 9960010060
4. पुरवठा निरीक्षक -श्री. रघुनाथ भोसले : 8329360051
5. ५. पुरवठा निरीक्षक - श्री. तानाजी काशिद : 7719839013
6. पुरवठा निरीक्षक - श्रीमती गीता गणेश डंके : 8390009855

# अकलूज येथील बैलगाडा शर्यतीत लखन - सर्जाने मारली बाजी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** पंचांची शिट्टी वाजली. कासऱ्याला झटका बसला. सळसळणाऱ्या पायात वीज संचारली. क्षणात रगेल, मस्तवाल, ताकतवान बैलांनी झेप घेऊन दौडायला सुरुवात केली. बैलगाड्यांचा तो अफाट वेग पाहून प्रेक्षक भान हरपून गेले. शिट्ट्या, आरोळ्यांबरोबर टोप्या, गमजे हवेत भिरकावले गेले. सीमेवरची पांढरी रेषा लखन आणी सर्जा या चपळ आणी बलदंड जोडीने पार करताच प्रेक्षकांनी प्रचंड कल्ला केला. गुलाल हवेत उधळला गेला. फटाक्यांची आतशबाजी सुरु झाली. आणी सहकार महर्षी केसरी बैलगाडा शर्यत वाशीमच्या लखन आणी सर्जा बैलजोडीने जिंकल्याचे जाहीर करण्यात आले.

शर्यतीत प्रथम क्रमांक पटकावलेल्या गाडी मालक मनोहर पाटील व साईनाथ पाटील यांना रोख रु.१ लाख ५० हजार व चषक बक्षीस तर बैलांना मानाची झुल, बाशिंग, शेंब्या, तुळशी हार माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

अकलूज-चाकोरे रोडवर आनंदनगर येथे श्री विजय गणेशोत्सव मंडळ पब्लिक ट्रस्टच्यावतीने सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्ताने सहकार महर्षी केसरी बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. यामधे राज्यभरातील ३७२ बैलगाडा स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेचा शुभारंभ माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. १० ओळीत स्पर्धा घेण्यात आल्या. प्रत्येक फेरीत ७ बैलगाडा सोडण्यात येवुन फेरीतील प्रथम क्रमांकाच्या बैलजोडी निवडुन उपांत्य फेरीतील विजेते अंतिम फेरीत ८ बैलगाड्या सोडण्यात आल्या. अंतिम फेरीतील बैलजोडी लक्ष्मण-सावकार (मालक नवनाथ जगदाळे व भारत वळकुंडे) वळकुंड (व्दितीय), बैलजोडी साई-अर्जुन मालक कार्तिक वावरे माळशिरस व अवतार पवार अंबड जालना (तृतीय), बैलजोडी सर्जा-रायफल मालक रणजित निंबाळकर साखरवाडी व आरोही घाडगे शिरसवाडी (चतुर्थ), चिक्या-बकासुर मालक मोहीत धुमाळ सुसगाव व अजित जगताप कारुंडे (पाचवा), बैलजोडी बुलेट- राजा मालक निखिल कोरडे खडकवासला व योगेश भगत शिरसूफळ (सहावा), बैलजोडी छावा-बदाम मालक विक्रम गोरे बागेहल्ली अक्कलकोट व तस्मिय्या सय्यद (सातवा), बैलजोडी चिक्या- नाथा मालक आशुतोष जाधव कलेढोण व वाशीम एक्स्प्रेस कराड (आठवा) यांना अनुक्रमे १ लाख १० हजार, ७१ हजार, ६१ हजार, ५१ हजार, ३१ हजार, २१ हजार, ११ हजार व स्मृती चिन्ह देण्यात आले.

यावेळी नंदिनीदेवी मोहिते पाटील, संयोजक मदनसिंह मोहिते पाटील, आ. रणजितसिंह मोहिते पाटील, खा.धैर्यशील मोहिते पाटील, जि.प.सदस्य अर्जुनसिंह मोहिते पाटील, विश्वतेजसिंह मोहिते पाटील, नगराध्यक्षा रेश्मा अडगळे, सत्यप्रभादेवी मोहिते पाटील, वैष्णवीदेवी मोहिते पाटील, भाऊसाहेब आंधळकर, सचिव राजेंद्र काकडे, विश्वस्त चंद्रकांत कुंभार, श्रीकांत राऊत, वसुंधरा देवडीकर यांच्यासह प्रेक्षक बहुसंख्येने उपस्थित होते.

# सामाजिक सलोखा राखत थोरला मंगळवेढा तालीम पंजाब तालीम यांच्या वतीने रोजा इफ्तार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** थोरला मंगळवेढा तालीम, पंजाब तालीम, शिवसेना जिल्हाप्रमुख तथा सोमपा गटनेता अमोल शिंदे व माजी सभापती मनपा शिक्षण मंडळ संकेत पिसे यांच्यावतीने पवित्र रमजान महिना निमित्त रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले आहे, सन २००७ साला पासून तत्कालीन पोलीस आयुक्त स्व. अशोक कामठे साहेब यांच्या उपस्थितीत थोरला मंगळवेढा तालीम हे महाराष्ट्रातले पहिले गणेशोत्सव मंडळ त्यामध्ये रोजा इफ्तार पार्टीचे कार्यक्रम घेण्यात आले होते, व आज सन २०२६ रोजी ही रोजा इफ्तार पार्टीर्चे आयोजन हे निरंतर आहे, सोलापूर शहर पोलीस उपआयुक्त गौहर हसन व उपायुक्त विजय कबाडे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली, याप्रसंगी नगरसेवक तोफिक हत्तुरे, नगरसेवक चेतन नरोटे, मनसे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, एमआयएमचे शहराध्यक्ष शौकत भाई पठाण, राजू कुरेशी, राजूभाई हुंडेकरी, नगरसेवक अझरभाई हुंडेकरी, माजी नगरसेवक रियाज खरादी, करीमभाई लोखंडवाला, युवा नेते ज्ञानेश्वर सपाटे, युवा नेते सागर पिसे, सोहेल कुरेशी, समीर शेख, प्रसाद कुमठेकर वाहिद विजापुरे, समीर लोंढे, जावेद वाडर, इब्राहिम शेख, राजू हुंडेकरी, इम्तियाज कमिशनर, गफूर दादा शेख, अल्फरान आबादीराजे, यांच्यासह मान्यवर व रोजा सोडणारे असंख्य बांधव उपस्थित होते.

# पिरळे परिसरातील रस्तेबाबत वारंवार मागणी करूनही रस्ता दुरुस्तीकडे दुर्लक्ष- प्रमोद शिंदे



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** पिरळे परिसरातील रस्ते सध्या मृत्यूचा सापळा बनले आहेत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांचा व सामान्य नागरिकांचा प्रवास धोक्यात आला आहे म्हणून १६ मार्च रोजी दरम्यान तीव्र आंदोलनाचा इशारा प्रमोद शिंदे यांच्याकडून देण्यात आला आहे.

प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अपघातांचे सत्र वाढले आहे.

पिरळे ते पिरळे चौक, शिवपुरी ते पिरळे चौक आणि एकशिव कुरबावी या मुख्य रस्त्यांची सध्या अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, या रस्त्यांवर पडलेले मोठे खड्डे प्रवाशांच्या जीवावर बेतत आहेत. या गंभीर प्रश्नाकडे संबंधित विभागाचे पूर्णतः दुर्लक्ष होत असून, रस्ता तात्काळ दुरुस्त न झाल्यास १६ मार्च दरम्यान प्रशासनाविरुद्ध तीव्र आंदोलन करण्याचा इशारा 'एन.डी.एम.जे.'चे राज्य प्रसिद्धीप्रमुख व उपविभागीय दक्षता नियंत्रण समिती नि. सदस्य प्रमोद शिंदे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. विद्यार्थ्यांचा प्रवास काटेवरची कसरत ठरत असून या मार्गावरून वालचंदनगर, नातेपुते, शिवपुरी, पिरळे आणि बारामती या ठिकाणी शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. रस्त्यावरील खड्डयांमुळे दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे मोठे नुकसान होत असून, विद्यार्थ्यांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. अनेक वेळा येथे छोटे-मोठे अपघात होऊन नागरिक जखमी झाले आहेत. हा रस्ता जणू मृत्यूलाच निमंत्रण देत असल्याची संतप्त भावना परिसरातून व्यक्त होत आहे.रस्त्याचे काम सुरू न झाल्यास होणाऱ्या तीव्र आंदोलनास व त्यातून उद्भवणाऱ्या परिणामास सर्वस्वी प्रशासन जबाबदार असेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

# समता सैनिक दलाचे एकदिवसीय प्रशिक्षण शिबीर उत्साहात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारतीय बौद्ध महासभेच्या पूर्व विभागाच्या वतीने समता सैनिक दलाचे एकदिवसीय प्रशिक्षण शिबीर गौतम नगर, गरिबी हटाव झोन क्र. १, विजापूर नाका येथील बुद्ध विहार येथे उत्साहात पार पडले. या शिबिराला मोठ्या संख्येने कार्यकर्ते, महिला व युवकांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदासाठी सोलापूर शहर अध्यक्ष अमित गायकवाड यांच्या नावाची सूचना प्रचार व पर्यटन प्रमुख धम्मपाल माने यांनी मांडली. प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय बौद्ध महासभा सोलापूर जिल्हा पूर्वचे महासचिव बाबासाहेब क्षिरसागर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्य महिला विभाग संघटिका शारदा गजभिये तसेच सोलापूर जिल्हा पूर्वचे कोषाध्यक्ष दत्तात्रय सिद्धगणेश यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. कार्यक्रमास नंदा ताई काटे (जिल्हा पूर्व महिला सरचिटणीस), महिला संस्कार प्रमुख आम्रपाली सर्वगोड, माजी जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब वाघमारे, शहर समता सैनिक दल प्रमुख बाबू रणखांबे, जिल्हा संघटक प्रा. जगन्नाथ शिंगे, शहर उपाध्यक्ष अजय मोरे, महेंद्र काटे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या प्रशिक्षण शिबिरात केंद्रीय शिक्षक यशवंत साबळे व विजय साळवे यांनी समता सैनिक दलाच्या सैनिकांना परेडचे प्रशिक्षण देत संघटन, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी याबाबत मार्गदर्शन केले. शिबिरात गणेश कांबळे, नागेश चौरे, तुषार बनसोडे, आदित्य सुर्यवंशी, हर्षराज बनसोडे, अश्वजीत गायकवाड, नागिनताई साबळे, सोमनाथ गायकवाड, पुष्पाताई गायकवाड, आवाड यांसह अनेक सैनिक व कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. समता सैनिक दल प्रमुख बाबू रणखांबे यांनी आभार मानले.

# 'युद्ध नको - शांतता हवी' : १ जून आंतरराष्ट्रीय शांतिदूत दिवस उपक्रमाची घोषणा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सामाजिक कार्यकर्ते प्रमोद झिंजाडे यांनी आज 'युद्ध नको - शांतता हवी- या संदेशासह १ जून आंतरराष्ट्रीय शांतिदूत दिवस साजरा करण्याचा जागतिक उपक्रम जाहीर केला आहे. या उपक्रमामध्ये जगभरातील शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन शांततेचा संदेश देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या संदर्भात संयुक्त राष्ट्र संघ तसेच विविध आंतरराष्ट्रीय संस्था, राष्ट्रीय मानव अधिकार आयोग आणि राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोग, नवी दिल्ली यांना अधिकृत निवेदन पाठविण्यात आले असून त्यासोबत 'युद्ध नको - शांतता हवी' असा संदेश असलेल्या ध्वजाचा नमुना देखील पाठविण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी १ जून रोजी शांततेची शपथ घेणे, शाळांमध्ये शांततेचा ध्वज फडकविणे आणि समाजात अहिंसा व मानवतेचा संदेश देणे असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच प्रत्येक नागरिकाने आपल्या वाढदिवशी घरामध्ये छोटासा शांततेचा ध्वज ठेवून वाढदिवस साजरा करावा, जेणेकरून दररोज जगात शांततेचा संदेश दिला जाईल, अशी संकल्पना मांडण्यात आली आहे. या माध्यमातून जगभरातील विद्यार्थ्यांनी शांततेचे दूत बनून युद्धमुक्त जगाच्या निर्मितीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन प्रमोद झिंजाडे यांनी केले आहे.

# शतायुषी चन्नवीरय्या स्वामीजींच्या पाचव्या पुण्याराधनानिमित्त नागणसूर येथे विविध कार्यक्रम



**नागणसूर (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट तालुक्यातील नागणसूर येथील श्री गुरु बम्मलिंगेश्वर बृहन्मठात शतायुषी लिं.चन्नवीरय्या स्वामीजी यांच्या पाचव्या पुण्याराधना कार्यक्रमानिमित्त मठाधिपती श्री श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी यांच्या नेतृत्वाखाली रविवार दि १५ ते २६ मार्च दरम्यान विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार दि. १५ मार्च सकाळी ८.०० वाजता जगद्गुरु पंचाचार्य ध्वजारोहण मैंदर्गीचे नीलकंठ शिवाचार्य स्वामीजी, कडबगांवचे वीरशिवलिंगेश्वर शिवाचार्य स्वामीजी यांच्या हस्ते होणार आहे.यावेळी जिंतूरचे अमृतेश्वर शिवाचार्य स्वामीजी व शहापूरचे सुगरेश्वर शिवाचार्य स्वामीजी यांची उपस्थिती लाभणार आहे. सायं.७.३० वा. गौडगांवचे डॉ. जयसिध्देश्वर शिवाचार्य स्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात हेमरेड्डी मल्लम्मादेवी पुराणाचे उदघाटन उपसरपंच शांताबाई प्रचंडे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी पुराणिक वीर विश्वाराध्य शास्त्री (गोरटा) यांना संगीतकार लिंगय्या स्वामी, तबला वादक गुरुस्वामी यांची साथ लाभणार आहे. सोमशेखर हिरेमठ, सिध्दलिंग शास्त्री, सिध्दय्या कवडी यांच्या वैदिकत्वाखाली चिदानंद मठपती व सोमय्या मठपती यांच्या सहकार्याने विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. शुक्रवार दि. २० मार्च रोजी रात्री ८.०० वाजता काशीपीठाचे जगद्गुरु श्री श्री श्री १००८ डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात श्रीमती सितामाता शेळके प्रशालेच्या आदर्श विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा होणार आहे.आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते लिं. वासप्पा करोटे व लिं.गंगाबाई करोटे यांच्या स्मरणार्थ पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.अंदेवाडीचे वीरभद्र शिवाचार्य स्वामीजी, सलगरचे शिवबसव स्वामीजी यांचा विशेष गौरव सन्मान करण्यात येणार आहे.नूतन जि.प. सदस्य सिध्दाराम शिवमूर्ती,तंटामुक्त अध्यक्ष प्रशांत प्रचंडे, तालुका काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कै.श्रेया विश्वनाथ शिवणगी यांच्या स्मरणार्थ शेळके प्रशालेच्या सर्व विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात येणार आहे. बुधवार दि. २५ मार्च रोजी सायंकाळी ७.०० वाजता पूज्य शतायुषी लिं.चन्नवीरय्या स्वामीजी यांच्या आत्मज्योतीचे प्रज्वलन औसाचे डॉ.शांतवीर शिवाचार्य स्वामीजी, नावंदगीचे शिवयोगी शिवाचार्य स्वामीजी, अक्कलकोटचे बसवलिंग स्वामी, कलहिप्परगाचे गुरुशांतलिंग शिवाचार्य स्वामीजी, हत्तीकणबसचे प्रभू प्रशांत स्वामीजी, उतनाळचे शिवपुत्रय्या स्वामीजी, करिबंटनाळचे शिवकुमार स्वामीजी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

गुरुवार दि. २६ रोजी सकाळी ६.०० वा. पूज्य श्री. लिं. शतायुषी चन्नवीरय्या स्वामीजींच्या क्रियासमाधीस रुद्राभिषेक, सायंकाळी ४.०० वाजता स्वामीजींच्या प्रतिमेचे मिरवणूक काढण्यात येणार आहे तरी सर्व सदभक्तांनी या कार्यक्रमात सहभाग घेऊन गुरु आशीर्वाद घ्यावे असे आवाहन श्री गुरु बम्मलिंगेश्वर बृहन्मठ नागणसूर व रेवूर सदभक्त मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

# बार्शीत अनधिकृत बांधकाम प्रकरण तापल

## नगरपरिषदेकडून गुन्हा दाखल करण्याची तयारी




**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी शहरातील अनधिकृत बांधकामाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असून नगरपरिषद प्रशासनाने संबंधित बांधकामधारकाविरुद्ध कठोर कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. परवानगीपेक्षा वेगळ्या पद्धतीने बांधकाम करून त्याचा वापर सुरू ठेवल्याप्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची तयारी प्रशासनाने केली आहे.

याबाबत बार्शी नगरपरिषदेचे सहाय्यक नगररचनाकार वैभव विकास पायगुडे (वय 29) यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, सागर नागेश लंकेधर (रा. बार्शी) यांनी 9 मार्च 2026 रोजी नगरपरिषदेकडे श्री. रामचंद्र विनायक जगताप यांच्या अनधिकृत बांधकामाबाबत तक्रार दिली होती. या तक्रारीची दखल घेत नगरपरिषद प्रशासनाने संबंधित जागेची प्रत्यक्ष पाहणी केली.

पाहणीदरम्यान नगरपालिकेने दिलेल्या बांधकाम परवानगीच्या अटींचे उल्लंघन करून बांधकाम करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. परवानगीपेक्षा वेगळ्या प्रकारे दगड, वीट, वाळू, सिमेंट तसेच लोखंडी साहित्याचा वापर करून आर.सी.सी. पद्धतीचे बांधकाम करण्यात आले असल्याचे आढळले. या ठिकाणी तळमजला व पहिल्या मजल्यावर 1.48 मीटर बाय 7.60 मीटर इतके बांधकाम करण्यात आले असून, निवासी वापरासाठी परवानगी असतानाही त्या जागेचा वापर व्यावसायिक स्वरूपात (लॅब) करण्यात येत असल्याचे तपासात समोर आले आहे.

तसेच दुसऱ्या मजल्यासाठी कोणतीही अधिकृत परवानगी नसताना 14.65 मीटर बाय 7.60 मीटर इतके बांधकाम करण्यात आले असून त्या बांधकामाचा वापरही सुरू असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. यापूर्वीही नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 53 अंतर्गत 13 जून 2019 रोजी नोटीस देऊन संबंधितांना परवानगीविरुद्ध केलेले बांधकाम काढून टाकण्याचे आदेश देण्यात आले होते.

मात्र त्यानंतरही नियमांचे पालन न झाल्याने नगरपरिषदेकडून 11 मार्च 2026 रोजी पुन्हा नोटीस बजावून 24 तासांच्या आत बेकायदेशीर बांधकाम उतरविण्याचे आदेश देण्यात आले. तरीही संबंधितांकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

त्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 53 (6 अ) अन्वये श्री. रामचंद्र विनायक जगताप यांच्याविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रकरणामुळे बार्शी शहरातील अनधिकृत बांधकामांवर प्रशासन किती कठोर भूमिका घेणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त आध्यात्मिक मानवंदना

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राच्या भक्तीपरंपरेतील तेजस्वी संत व्यक्तिमत्त्व असलेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त राज्यभर विविध आध्यात्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर 'ज्ञानियांचा राजा - मोगरा फुलला' हा विशेष आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम शुक्रवार, दिनांक २० मार्च २०२६ रोजी सायं. ६.०० वाजता श्री सरस्वती मंदिर प्रशाला, दत्त घाट, गणपती चौक, सोलापूर येथे आयोजित करण्यात आला आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरी, भावार्थदीपिका यांसारख्या ग्रंथांद्वारे अध्यात्म आणि तत्त्वज्ञान सर्वसामान्यांच्या बोलीभाषेत मांडले. समता, प्रेम, भक्ती आणि मानवतेचा संदेश देत त्यांनी समाजमनात प्रबोधनाची ज्योत पेटवली. त्यांच्या विचारांचा प्रभाव आजही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक जीवनावर स्पष्टपणे जाणवतो. त्यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित हा कार्यक्रम त्यांच्या विचारसंपदेचा आणि संतपरंपरेचा गौरव करणारा ठरणार आहे. या कार्यक्रमात 'ज्ञानियांचा राजा -मोगरा फुलला' या संकल्पनेवर आधारित विशेष सादरीकरण होणार असून प्रख्यात व्याख्याते व स्वास्थ्य व समाज विषयक प्रबोधनकार श्री. गणेश शिंदे यांचे संत ज्ञानेश्वरांच्या अध्यात्मदर्शनावर आणि त्यांच्या विचारांच्या सामाजिक परिणामांवर आधारित प्रेरणादायी व्याख्यान होणार आहे. त्यांच्या मार्गदर्शनातून ज्ञानयोग, भक्तियोग आणि समाजप्रबोधन या संत परंपरेतील महत्त्वपूर्ण मूल्यांचा उलगडा होणार आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. संतपरंपरेचे संवर्धन, सांस्कृतिक वारशाचे जतन आणि समाजात आध्यात्मिक जागर निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे.

सोलापूर व परिसरातील नागरिक, विद्यार्थी, संत साहित्याचे अभ्यासक तसेच भाविकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून संत ज्ञानेश्वर माऊलींच्या समृद्ध अध्यात्मपरंपरेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम पांडे, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहे.